
मी एक पक्षीण आकाशवेडी
दुजाचे मला भान नाही मुळी
डोळ्यांत माझ्या असे एक आकाश
श्वासात आकाश प्राण तळी.

# छात्र प्रबोधन

सौर फाल्गुन शके १९१९
वर्ष ६ अंक ८




ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक!


तिच्यासाठी वाट पाहे
एक किरण सूर्याचा,
मिळवून देऊ हक्क तिला
फूल म्हणून जगण्याचा.

ॐ



इवली शल्ये रुपती खुपती,
मात करू द`त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया

**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc. B.Ed.
अनघा लवळेकर M.A. , B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
शैलेश वेदपाठक

**अक्षरजुळवणी**
प्रिंट लिंक, पुणे

**संपर्क पत्ता**
**'छात्र प्रबोधन'**
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ ०२१२-४७७६९१, ४७८०९५

**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर १० फाल्गुन, शके १९१९
१ मार्च १९९८.

**वर्गणी**
**भारतात**
**वार्षिक :** रु.१२५/- **द्वैवार्षिक :** रू.२४०/-
**त्रैवार्षिक :** रु.३५०/- **आजीवन :** रु.२०००/-
**भारताबाहेर - वार्षिक -** ३० डॉलर

**वर्ष ६ अंक ८**
**सौर फाल्गुन**
**शके १९१९**

# छात्र प्रबोधन

## अंतरंग

२ **संवाद**

३ **जागतिक महिला दिनानिमित्त**

**काही विशेष लेख :**

**: आकाशी झेप घेते :** विनिता अनगळ

**: सुंदर मी होणार :** अनघा कुकडे-लवळेकर

**: चौघी :** शैलजा देशमुख

**: मी मुलगा/मुलगी आहे म्हणून... :** ज्योती कानिटकर

११ **राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र** : र. म. खाडे

१३ **एकट्याची होळी** : गणेश दिघे

१६ **शहाणपणाची परंपरा :** सुभाष देशपांडे

१७ **कथा : सुवर्णरेखाची रोजनिशी** : लीला दीक्षित

२२ **कविता पानोपानी : आई :** अंजली कुलकर्णी

**: मी :** (अनुवादित) सरला दिघे

२३ **अभ्यासातील स्वावलंबन-'लेखन' भाग ३ :** विवेक पोंक्षे


२७ **उस्ताद शाहीद परवेझ यांच्याशी गप्पा** : अलिबागचे प्रबोधक

२९ **ओळख ग्राहक वरदान कायद्याची** : सूर्यकांत पाठक

३१ **दीर्घकथेचा पुढचा भाग** : कु. अमेय फाटक

३२ **स्थानिक पत्ते**

**जन्मांची माया यावी, माणूसपणाच्या काठी, तशि पिकलेल्या ओवीची, प्रार्थना तरळली ओठी.**




स्वागत करूनी नववर्षाचे
गतवर्षांना स्मरू,
संकल्पांची गुढी उभारू
विक्रम काही करू।

## संवाद

प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,

एव्हाना अभ्यासाला जोरदार सुरुवात झाली असेल. दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा तर अगदी तोंडावर येऊन ठेपली आहे. इतरांचीही महिन्याभरात आहेच. तेव्हा दिवसातला अधिकाधिक वेळ (खेळ-व्यायामाला मात्र तासभर वेळ राखून ठेवायचाच बरं का!) अभ्यासाला वापरा. 'परीक्षेच्या आदल्या दिवशी सगळा अभ्यास करू' यावर अवलंबून राहू नका. यापूर्वीच्या मासिकांमध्ये 'अभ्यासातील स्वावलंबन' या लेखमालेत येऊन गेलेले लेख पुन्हा एकदा वाचा. यातील तंत्रांचा वापर करून अधिक नेटका, चांगला, नियोजनपूर्वक, आत्मविश्वासाने व एकाग्र चित्ताने अभ्यास केला तर यश नक्कीच मिळेल. यशस्वी होण्यासाठी कष्ट, मेहनत याला पर्याय नाही बरं का! तुमच्या अभ्यासासाठी अन् वार्षिक/शालांत परीक्षांसाठी शुभेच्छा!

**८ मार्च हा जागतिक महिला दिन** म्हणून साजरा केला जातो. पर्यावरण दिन, अपंग दिन, ग्राहक दिन, बालक दिन असे कितीतरी दिवस वर्षभरात येत असतात. त्या निमित्ताने मोठमोठ्या परिषदा होतात. चर्चा होतात, समारंभ होतात. संबंधितांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फुटते. न्याय्य मागण्यांसाठी ठराव होतात आणि बघता बघता ते सर्व विरूनही जाते. या दिवसांच्या निमित्ताने हा सर्व ऊहापोह उपयुक्त आहे पण पुरेसा नाही, त्यातून **आपल्या रोजच्या वागण्या-बोलण्यात, इतरांना समजून घेण्यात, चुकीचे पूर्वग्रह दुरुस्त करण्यात काही विधायक बदल झाले तर या दिवसांना अर्थ प्राप्त होईल.**

महिला दिनाच्या निमित्ताने या अंकाच्या मुखपृष्ठावर व आतील पानावर दोन परस्पर विरोधी छायाचित्रांचे कोलाज छापले आहे. भारतातल्या ग्रामीण भागातल्या बहुसंख्य मुलींचे आयुष्य आतील बाजूस चित्रित झालंय. तर त्यातल्याच काहींना विकासाची संधी मिळाल्यामुळे स्वत:च्या सामर्थ्याची, आत्मविश्वासाची जाणीव झालेली मुखपृष्ठावर दिसत आहे. एकाच पानाच्या (नाण्याच्या) या दोन बाजू आहेत. कोठून कोठे प्रवास करायचा हे यातून कळतंय. **एकविसाव्या शतकात जाताना अधिकाधिक मुलींना ही विकासाची संधी मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील राहूयात.** घरात कामाला येणाऱ्या मुलीपासून, आसपासच्या वाड्या-वस्त्या-खेडी येथील मुलींपर्यंत हे सर्व कसं पोहोचेल हे पाहूयात. आपण सर्वांनीच हे करायला हवंय. घरातील आई, बहीण हे काम अधिक सहज करू शकतील. त्यांना ते करायला वेळ मिळावा म्हणून मुलांनीही घरातल्या कामाची जबाबदारी स्वत:हून घ्यायला हवी. अशी परस्पर सामंजस्याची भावना निर्माण झाली तर वेगळा महिला दिन साजरा करायची गरजच पडणार नाही.

**ग्राहक दिनाच्या निमित्ताने आपण अधिक चिकित्सक, चौकस ग्राहक व्हायचं ठरवूयात.** मुळामध्ये तुम्ही विविध वस्तूंची खरेदी करायला घराबाहेर पडता का? त्यासाठी चार-सहा दुकानांमध्ये चौकशी करता का? किंमतीमधील फरक, मालाची गुणवत्ता, त्याची उपयुक्तता या सर्वांचा योग्य विचार करून खरेदी करता का? आपल्याला कोणी फसवतं का? असं फसवणाऱ्या विरूद्ध आपण आवाज उठवतो का? हे सर्व करायला अन् कळायला लागलं की आपोआप आपल्याला चिकित्सक ग्राहक जागा होईल. पण **त्यासाठी व्यवहारातले अनुभव गोळा करायला तर सुरुवात करा.**

परीक्षेत कॉपी न करण्यासंबंधी, न करू देण्यासंबंधीचे आवाहन शेवटच्या पानावर वाचालच. त्याला जोरदार प्रतिसाद द्याल ना!

**गुढीपाडव्याच्या निमित्ताने सुरू होणारे नवीन शालीवाहन शके तुम्हा सर्वांना उत्साहाचे, मनसोक्त कष्ट करण्याचे, यशस्वी होण्याचे जावो.** त्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

**सस्नेह तुमचा**

**(महेंद्र सेठिया)**

**नव्या युगाचे पाईक आम्ही, तारे नवक्षितिजावरचे। निज रुधिराची आण वाहूनि, रूप पालटू देशाचे।।**

*८ मार्च हा दिवस ''जागतिक महिला दिन'' म्हणून साजरा केला जातो. खरं म्हणजे असा स्वतंत्र दिन साजरा करण्याची वेळच येऊ नये. खरेखुरे स्त्री-पुरुष समानतेचे वातावरण ज्यादिवशी समाजात निर्माण होईल, तो खरा सुदिन! आपापली बलस्थाने आणि मर्यादा ओळखून प्रत्येक मुलगा आणि मुलगी यांनी आत्मनिर्भर बनायला हवं!*

*आज शहरात मुली मुक्तपणे विविध क्षेत्रात प्रगती करताना दिसतात. त्याचवेळी खेड्यातील मुलींना छोट्या गोष्टींसाठी कसं झगडावं लागतं - हे जाणायचं असेल तर 'आकाशी झेप घेते!' या लेखातील अनुभव वाचायलाच हवेत!*

*'सुंदर मी होणार!' या लेखातून स्वत:कडे पाहाण्याची एक वेगळीच दृष्टी तुम्हाला मिळेल! 'चौघी' मधल्या चारजणी तर तुम्हाला अवतीभवती नेहमीच भेटतात. आपली स्वत:ची ओळख त्यातल्या कुणाशी पटते ते पाहू या, आणि आपली आपणच पुढच्या आयुष्याची दिशा ठरवू या! 'मी मुलगी/मुलगा आहे म्हणून...' या परिसंवादातून थेट अगदी तुमच्या मनातल्याच प्रतिक्रिया तुम्हाला अनुभवायला मिळतील. जागतिक महिला दिनाच्यानिमित्ताने हे एक प्रकट चिंतन! केवळ मुलींसाठी नाही, तर सर्वांसाठी!*

# आकाशी झेप घेते....

**- विनीता अनगळ**

कुसगाव हे अत्यंत छोटे खेडेगाव. तिथल्या मुलींसाठी काही कार्यक्रम सुरू करावा, या हेतूने मी या गावात गेले. गावात मुली पुष्कळ आहेत. गावात सातवी पर्यंत शाळा आहे. त्यामुळे सातवी पर्यंतच मुली शिकतात, पुढे एखाद-दुसरी मुलगीच शिकते; नाहीतर पाणी भरणं, स्वयंपाक करणं, लहान भावंडांना सांभाळणं याच कामात तिचा वेळ जातो. अशी गावातल्या बायकांकडून माहिती मिळाली. मुलींना अनेकदा एकत्र जमवण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! घरातल्या कामांपुढे खेळणं, वाचन करणं, नवीन माहिती मिळवणं हे काही त्यांना फारसं महत्त्वाचं वाटायचं नाही. हे अगदी सुरुवातीचं चित्र! मुली येत नसल्या तरी मी गावात जातंच होते.

यावर्षी गावात नेहमीप्रमाणे गणपती बसवला गेला. गणपतीपुढे गावातील मुलंच कार्यक्रम करतात. मी मुलींना म्हटलं, ''यावर्षी गणपतीपुढे आपण कार्यक्रम करूयात. गावातले प्रश्न, मुलींचे प्रश्न आपण पथनाट्याद्वारे गणपतीपुढे मांडूयात.'' मुलींना कल्पना एकदम आवडली. पण ज्या मुली घरात भावापुढे, वडिलांपुढे बोलायला धजावत नाहीत त्या ग्रामस्थांसमोर कार्यक्रम करणार तरी कशा? मुलींनी पाय लगेच मागे घेतले. त्यांना बरंच समजावलं. शेवटी ''नुसता कार्यक्रम तरी बसवूयात, तो सादर करायचा की नाही हे नंतर ठरवू.'' ही गोष्ट मुलींना पटली आणि पथनाट्याचा विषय घेतला, 'लहान वयात होणारी मुलींची लग्नं'

हे पथनाट्य लिहिलं ते शिवापूरमधल्याच अकरावीतल्या मुलीने! आणि ते मुलींकडून तिने बसवूनही घेतलं. दररोज संध्याकाळी शाळा सुटल्यावर मुली ग्रामपंचायतीच्या ऑफिसमध्ये जमत. पथनाट्याची तयारी अगदी जोरात चालू झाली. मुलींचं नाटक अगदी छानच बसलं. प्रश्न होता तो गावापुढे ते नाटक सादर करायचं की नाही. हो-नाही, हो-नाही करता करता मुलींनी शेवटी गावापुढे ते पथनाट्य सादर केलं. लवकर लग्नामुळे होणारे दुष्परिणाम मुलींनी न घाबरता पथनाट्याद्वारे गावापुढे सादर केले. कुसगावची दलप्रतोद दीपाली, हिचा जीव अगदी भांड्यात पडला, नंतर मुलींच्या अंगात कुठली शक्ती संचारली माहीत नाही. मग मुलींनी हाच कार्यक्रम एकूण ७ गावांमध्ये सादर केला.

गावातील लोकांनी खूपच आश्चर्य व्यक्त केलं. आपल्या मुलींमध्येही

**मी व्याकुळ गाणे गात, असे विजनात लाविले दीप, उजळता राउळे येथ, कुणी सत्त्वस्थ दाखविल रूप।**

अनेक चांगले गुण आहेत आणि ते आपण वाढवले पाहिजेत, याची जाणीव पालकांना झाली.

...शिवापूरचं मैदान! या मैदानामध्ये अनेक मुली धडपडत सायकल शिकत होत्या. शिकता-शिकता अनेक वेळा पडत होत्या. त्यांना लागत होतं. जखमांमधून रक्तही येत होतं. पण त्याची त्यांना पर्वा नव्हती. त्यांचं एकच ध्येय होतं. कुठल्याही परिस्थितीत सायकल शिकायचीच आणि शिबिरातल्या शेवटच्या दिवशी अनेक मुलींना सायकल चालवता यायला लागली. केवढा आनंद त्या मुलींना झाला होता, हे शब्दात व्यक्त करणं कठीणच आहे.

याच शिबिरातला असाच एक प्रसंग. मुलींच्यासमोर एक टी.व्ही. सारखं दिसणारं यंत्र होतं. याला काय म्हणतात? याचा उपयोग काय? हे जाणून घ्यायला मुली खूपच आतुर झाल्या होत्या. आपल्यासमोर आहे तो कॉम्प्युटर! कधी तरी शब्द नक्की ऐकला होता. आता ही गोष्ट फक्त ऐकीव राहिली नाही तर मुलींनी चक्क कॉम्प्युटरवर स्वत:चं नाव टाईप केलं, त्याचं आऊट पूट काढलं.

शिबिरातून घरी जाताना मुली बरोबर घेऊन गेल्या एक स्वत:विषयीचा आत्मविश्वास! गणेशोत्सवातल्या कार्यक्रमातून सभा-धीटपणा त्यांच्यात निर्माण झालाच होता. त्याचप्रमाणे क्रीडा प्रात्यक्षिके शिवापूरमध्ये करायची, असं एक स्वप्न या सगळ्या मुलींनी बघितलं आणि ते वास्तवात उतरवलं सुद्धा! २६ जानेवारी १९९७ रोजी या १५० मुलींनी शिवापूरमध्ये भव्य क्रीडा प्रात्यक्षिके



सादर केली. त्यात याच कुसगावच्या मुलींनी सूर्यनमस्कार सादर केले.

आता कुसगावमध्ये मुलींना बोलवावं लागत नाही. त्या आपणहून ठरलेल्या दिवशी एकत्र जमतात. एकत्र खेळतात, अभ्यास करतात, वाचन करतात, विविध विषयांवर चर्चा करतात. एवढंच काय तर मोठ-मोठी स्वप्नं बघतात आणि ती वास्तवात उतरवण्याचा प्रयत्नही करतात.

●●

**कु. विनीता प्रमोद अनगळ**
५४/२ यशश्री गार्डन,
कर्वेनगर, पुणे ५२.

## पुस्तक-परिचय स्पर्धेचा निकाल

मुलांनो, वर्ष ६ अंक ४ म्हणजेच यंदाच्या, 'दिवाळी अंका'त तुमच्यासाठी, 'तुम्हीच लिहा पुस्तक-परिचय!' ही स्पर्धा जाहीर केली होती. पुस्तकांबरोबर तुमची मैत्री वाढावी, या उद्देशाने काही पुस्तकांची यादीही सोबत दिली होती. या स्पर्धेला तुमच्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला, हे लिहायला नक्कीच आनंद वाटतो. यादीतील पुस्तकांची परीक्षणे लिहिण्याबरोबरच तुम्ही ती पुस्तके मुद्दाम वाचलीत ह्याला आमच्यादृष्टीने अधिक महत्त्व आहे. असेच प्रयत्न तुम्ही यापुढील काळातही करत राहावेत, यासाठी अनेकानेक शुभेच्छा! व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन!

**प्रथम क्रमांक** : **श्रद्धा वसंत पाटील** – नटसम्राट (ले. वि. वा. शिरवाडकर)
इ.९वी, तात्या सामंत माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव, जि. जळगांव

**द्वितीय क्रमांक** : **योगिता संजय मेहेंदळे** – यक्षाची देणगी (ले. जयंत नारळीकर)
६३२, गणपती आळी, वाई, जि. सातारा.

**तृतीय क्रमांक** : **अद्वैत दिवाकर इंगोले** – सुदाम्याचे पोहे (ले. श्री. कृ. कोल्हटकर)
जे. डी. चौरे विद्यामंदिर, कारंजा लाड, जि. अकोला.

**उत्तेजनार्थ** : **१) संपदा साठे** (पुणे), **२) राहुल चुंबळे** (कारंजा),
**३) रश्मी पटवर्धन** (पुणे)

*(पुढील अंकामध्ये ही पुस्तक परीक्षणे छापली जातील.)*

**पक्ष्यांची दुखरी पिसे, फुलांचे तसे हुळहुळे अंग, विस्कटते घरटे भिजुनी, पाकळीवरून उडाले रंग।**

# सुंदर मी होणार!

**– अनघा कुकडे–लवळेकर**

**क्ला**सला उशीर होईल म्हणून नीरजा जोरजोरात सायकल मारत होती. घड्याळातला काटा, नऊला दहा मिनिटं कमी असल्याचं दाखवताना, ती धापा टाकत क्लासच्या इमारतीपाशी पोचली. बघते तर काय – तिच्या मित्रमैत्रिणी – ईशा, नभा, आदिती, गौरव, साहिल सगळे दारातच उभे. ''हे काय? आत नाही गेलात?'' नीरजानं विचारलं. ''सरांना अचानक दिल्लीला जावं लागलं. म्हणून सुट्टी.'' गौरव. ''चला, मग आता! आदितीकडे कॉफी पिऊया– काय गं– देतेस का?'' ईशानं तेवढ्यात टूम काढली. आदितीच्या घरी पोहोचल्याबरोबर गौरव म्हणाला, ''आदिती, जरा टी.व्ही. लाव ना– मॅच बघू दे.'' ''दहावीचं वर्ष आहे महाराज– विसरा मॅचबिच. पुढच्या आठवड्यात घटक चाचणी आहे ना!'' इति, नभा, म्हणजे एकदम अभ्यासू प्राणी!

आदितीची आई म्हणाली, ''अरे लावा रे थोडा वेळ – कॉफी होईपर्यंत! मग मात्र अभ्यास.'' टी.व्ही. लावला तर मॅच नव्हतीच. कुठलीतरी एक सौंदर्यस्पर्धा सुरू होती. दुसऱ्या चॅनेलवर सिनेमातली गाणी. तिसऱ्यावर जाहिरातींचा मारा. शेवटी वैतागून ईशा म्हणाली, ''जाऊ दे – मरू दे! आपण गप्पाच मारूया.'' ''नीरजा, तुझ्या ताईला मध्ये कुठलं गं बक्षीस मिळालं? मिस् युनिव्हर्सिटीचं ना? तिला पण आता जाहिरातीच्या ऑफर्स येत असतील ना?'' नीरजाला हसू येणार होतं – ते दाबत ती म्हणाली, ''काय गं, तुला असं का वाटलं?''

''का म्हणजे? काय गं आदिती सौंदर्यस्पर्धेत बक्षीस मिळालं की हेच – जाहिराती, टी.व्ही. वर सिनेमात काम... नाही का? हो म्हणजे खूप छान छान दिसायचं – हसायचं – नव्या नव्या फॅशनचे कपडे घालायचे भरपूर मेकअप! सौंदर्य स्पर्धेकरता अजून काय लागतं?''

गौरव म्हणाला, ''हल्ली तर पुरुषांच्या पण सौंदर्यस्पर्धा होतात म्हणे– त्यातसुद्धा हे असंच असतं. वेगवेगळे पोशाख, रूबाबदारपणा हेअरस्टाईल्स वगैरे– कसले सही ड्रेसेस असतात, माहितीय?''

साहिलनं तेवढ्यात टोकले, ''काय रे गौरव, तुलाही उतरायचं काय पुरुषांच्या सौंदर्यस्पर्धेत?''

कॉफी घेऊन आत येणाऱ्या आदितीच्या आईनं– रेखाताईंनी हे ऐकलं. त्या म्हणाल्या, ''कशावर चाललीये इतकी गरमागरम चर्चा?'' नीरजा म्हणाली, ''काकू, अहो माझ्या ताईला ना परवा मिस् युनिव्हर्सिटीचं बक्षीस मिळालं. यांना सगळ्यांना वाटतंय की मिस् युनिव्हर्सिटी म्हणजे या सगळ्या मिस् इंडिया वगैरेच्या कशा स्पर्धा असतात तसंच हे आहे, पण अहो, ही अगदी वेगळी स्पर्धा होती.''

''वेगळी म्हणजे? ही सौंदर्यस्पर्धा नव्हती?'' नभानं कुतूहलानं विचारलं. साहिल म्हणाला, ''हँ ! मग कसली ती ''मिस'' युनिव्हर्सिटी?'' रेखाताई म्हणाल्या, ''अरे पण आधी ती काय म्हणतेय ते तरी ऐका. सांग गं नीरू काय काय होतं ते!''

''किनई, पहिल्यांदा त्यांनी सगळ्या १०० स्पर्धकांकरता एक सामान्य ज्ञानाची कसोटी ठेवली होती. त्यात ना जुजबी शास्त्रीय माहितीपासून ते अगदी ताज्या राजकीय, सामाजिक घडामोडीपर्यंत खूप काय काय विचारलं होतं. ताई म्हणाली, की आपण किती alert असतो याचा अगदी कस लागला. त्यातून मग त्यांनी १० स्पर्धक फक्त निवडले. त्यांच्याकरता २/३ वेगवेगळे विषय ठेवले होते. त्यावर पाच–पाचच्या दोन गटात त्यांना वादविवाद करायचा होता. आमच्या ताईच्या ग्रुपला विषय आला होता की, विना अनुदान महाविद्यालयांना परवानग्या द्याव्यात की नाही?''

''अय्या, काय धमाल विषय ना! माझ्या मते तर मुळीच नको'' मध्येच ईशा न राहावून म्हणाली.

''असं नाही मांडायचं! त्या चर्चेत कोण कुठले मुद्दे मांडतो, किती ठासून

**किति उग्र वनाचा गंध, सर्पापरि विळखे घाली। सय आईच्या शब्दांची, ये आकुल अन् तान्हेली।।**

मांडतो, कशा प्रकारे न संतापता आपले विचार इतरांना पटवतो, ते सगळं त्यांनी पाहिलं आणि मग तिसऱ्या राऊंड करता त्यातून चौघं निवडले. दोन मुले आणि दोन मुली.''

''आणि मग. त्यांना छान छान ड्रेसेस घालून स्टेजवर चालायला सांगितलं असेल ना?'' इति साहिल.

''अरे गप रे! तुला छान छान कपड्यांशिवाय दुसरं काही सुचत नाही का?'' आदितीनं त्याला फटकारलं.

''नंतरची फेरी होती ती आयत्या वेळी दिलेल्या विषयावर फक्त तीन मिनिटात विचार करून – तीन मिनिटात बोलण्याची! त्यात जो चतुरपणे आपला विषय मांडेल, नेमके मुद्दे मांडेल त्याला सर्वाधिक गुण. माझ्या ताईला माहितीये का कुठला विषय आला होता ते.''

''ए कुठला गं?'' उत्सुकता आवरत गौरव म्हणाला.

''अरे, भारतीय सिनेमातलं स्त्रीचं बदलतं रूप'' ''बापरे! एवढा अवघड विषय तीन मिनिटांत मांडायचा. खरंच ताई ग्रेटच आहे हं तुझी'' ईशा म्हणाली. ''आणि या सगळ्यात तिनं चांगला Performance दिला म्हणून ती ''मिस युनिव्हर्सिटी'' झाली, नाही का?'' रेखाताईंनी म्हटलं.

''पण काकू, अशी स्पर्धा म्हणजे काही सौंदर्यस्पर्धा नाही. यात कुठे सुंदर दिसण्याला जागा आहे. कुणीपण काळी, ढब्बी, गबाळी माणसं यात भाग घेऊ शकतील.'' साहिलची शंका.

रेखाताई म्हणाल्या, ''साहिल अरे, मुळात ही ''सौंदर्यस्पर्धा'' अशा



नावाखाली नव्हतीच आणि त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे सौंदर्य काय फक्त तनाचं असतं का रे? मनाचं नसतं का? तुम्ही कसे ''दिसता'' यापेक्षा तुम्ही कसे ''असता'' हे जास्त महत्त्वाचं नाही का?''

''बरोबर गं आई'' आदितीनं पुष्टी जोडली. ''ज्याचं वागणं, बोलणं सुंदर असतं ती व्यक्ती दिसायला साधी असली तरी आपल्याला आवडते. अरे, आपल्या बाखलेबाई किती साध्या राहतात. पण त्या इतक्या प्रेमानं आपल्याशी बोलतात की बस्स. त्या सुरेखच दिसतात मला तर!''

''खरंय तुझं आदिती. शरीरावर मेकअपचे थर आणि दागिन्यांची आरास करण्यापेक्षा एक निर्मळ हसू आपल्या चेहऱ्याचं सौंदर्य कितीतरी पटींनी वाढवतं. A smile is the best ornament you wear, माहीत आहे ना?''

''आणि काकू मेकअप वगैरेपेक्षा ही चांगला पौष्टिक आहार आणि व्यायाम यांनीच खरं तर आपलं शरीर जास्त निरोगी आणि तजेलदार दिसतं. परवा ते निसर्गोपचारतज्ज्ञ आले होते ना ते तर म्हणालेसुद्धा की, मी सांगतो तसा जर नियमित आहार घेतलात आणि व्यायाम केलात तर मेकअपनं खोटं खोटं सुंदर दिसणाऱ्यांपेक्षा कितीतरी पट सौंदर्य तुमच्या शरीराला मिळेल.'' नभानं मध्येच सांगितलं.

''परवा ना, आमच्या वर्गात एक खेळ झाला बरं का. त्यात आपल्याला सर्वांत सुंदर वाटणाऱ्या व्यक्तीचं नाव सांगायचं होतं. त्यात खूप जणींनी सिनेमा नट्यांची नावं लिहिली. एक दोघींनी सुस्मिता सेनचं वगैरे नाव लिहिलं. पण एका मुलीनं नाव लिहिलं होतं मदर तेरेसाचं! तिला विचारलं तर ती म्हणाली की– त्यांची सेवावृत्ती हेच मला त्यांचं सौंदर्य वाटतं. किती वेगळा विचार आहे नाही का?''

नीरजानं म्हटलं, ''खरे तर सौंदर्य म्हटलं की वृत्तीचं सौंदर्य डोळ्यांपुढे यायला हवं. याचा अर्थ चेहरा सुंदर असणारे सुंदर नव्हेत असं नाही हं. पण सुंदर म्हणण्याकरता तेवढंच पुरतं का? आपण किती आत्मविश्वासानं वावरतो. नीटनेटके राहातो. मृदुपणे दुसऱ्यांना समजून घेत बोलतो– हे सगळं आपल्यातलं आंतरिक सौंदर्यच नाही का? अर्थात् हे सगळं मला ताईकडूनच समजलं.''

''ए खरंच, आपण आपल्यापुरती तरी सौंदर्याची व्याख्या आता अशीच करूया का? की अंतरीच्या गुणांनी जो

**देहाचे पान थरारे, मज हवीच माझी माती, दुःखाच्या ओटीवरती, तू लाव स्मिताची पणती.**

चेहरा उजळून निघतो तो खरा सुंदर!''

रेखाताई म्हणाल्या, ''यावर ना बा.भ. बोरकरांची फार सुरेख कविता आहे. त्याचं पहिलं कडवं आहे–

*''देखणे ते चेहरे जे प्रांजळाचे आरसे,*
*गोरटे की सावळे*
*या मोल नाही फारसे.''*

''किती सुंदर ओळी आहेत आणि पुढे गं आई?'' आदिती म्हणाली.

''पुढच्या ओळी तुम्ही शोधून काढायच्या आणि पुढच्या वेळी याल तेव्हा मला म्हणून दाखवायच्या, कबूल?''

''कबूल काकू, कबूल'' सगळे एकसूरात ओरडले.

●●

**अनघा कुकडे–लवळेकर**
ज्ञानिया, २४, विवेक सोसा., पद्मावती, पुणे ९.

# चौघी

**– शैलजा देशमुख**

**टे**परेकॉर्डरवर गाण्याचे सूर, मैत्रिणींचं हसणं, खिदळणं, मोठ्यांच्या कौतुकाच्या नजरा... दीपाची इकडेतिकडे लगबग चालू होती. काही महिन्यांपूर्वीच दीपाने वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केला होता. सध्या मुंबईतील एका सरकारी रुग्णालयात तिचे प्रशिक्षण चालू होते. एक वेगळंच जग तिला अनुभवायला मिळत होतं. आज खूप दिवसांनी ती सुट्टी घेऊन घरी आली होती. आईने तिच्या मोजक्या मैत्रिणी, नातेवाईक यांना बोलावलं होतं.

स्वयंपाकघरात आईच्या हाताखाली काम करणारी नंदा संकोचाने चोरून सगळीकडे नजर टाकत होती. एकीकडे चेहऱ्यावर हसू होतं तर दुसरीकडे एक खिन्न छटा! दीपाने तिला बाहेर हाक मारली, ''नंदा, अगं ये ना आमच्याबरोबर!''

''नको दीपाताई, मी घेते नंतर, जरा काकूंना मदत करते.'' स्वयंपाकघरात तिच्याभोवती तीन छोटी मुले घोटाळत होती. कार्यक्रम संपला. नंदाही घरी गेली. दुसऱ्या दिवशीही आईच्याऐवजी नंदा कामाला हजर! गळ्यात मंगळसूत्र होतं पण चेहऱ्यावर तेज नव्हतं. दीपाने आईकडे चौकशी केली. ''आई गं, नंदाचं लग्न कधी झालं?''

''अगं, पाच वर्ष झाली. तू बारावी पास होऊन तिकडे कॉलेजला गेलीस अन् इकडे हिचं लग्नसुद्धा झालं. काय भोग असतात एकेकाचे! ती तुझ्याच तर वयाची! तू नुसती वारा पिऊन हुंदडतेस, काय काय स्वप्नं पाहातेस! आणि ही नंदा– पदरी तीन पोरं आहेत बिचारीच्या. सासरच्यांनी काही धड वागवलं नाही. मरे मरेस्तोवर काम करायचं, पण कधी प्रेमाचा शब्द नाही. घरात बऱ्यापैकी सुबत्ता असूनही पोटभर अन्न नाही. प्रसंगी मार मात्र खायचा. कंटाळली बघ जाचाला अन् शेवटी कंटाळून इकडे आईकडे आली.''

दीपाला क्षणभर काही सुचेना. दोघी एकाच वयाच्या. लहान असताना नंदा शाळेत जायची. वाचनाची तिला विलक्षण आवड. सुट्टीच्या दिवशी आईबरोबर कामाला आली की दीपाची गोष्टीची पुस्तकं वाचत बसायची. दोघी एकत्र खेळायच्या. बघता बघता नंदाची शाळा कधी बंद झाली हे दीपाच्या लक्षातही आलं नाही ती नियमित आईबरोबर कामाला यायला लागली.

''काय करायचंय शिकून, तेवढीच दोन घरची भांडी घासायला मदत होते.'' नंदाच्या आईचं हे तत्त्वज्ञान! दीपाच्या आईने कितीही समजावलं तरी त्यांनी आपलं तेच खरं केलं आणि आज तिची ही दशा!

चार दिवसांनी नंदा कामाला आली. आज ती खूपच गप्पगप्प होती. दीपाने विचारलं, ''काय नंदा, आज गप्पशी?''

''काय सांगू ताई, माहेरी आले खरी, पण भावजयीच्या नजरेत मी आणि माझी लेकरं खुपतो. कितीही काम केलं तरी समाधान नाही. आज खूप बाचाबाची झाली.'' बोलताना तिला रडूच कोसळलं.

तीन मुलं पदरी असलेल्या नंदाचं भविष्य काय हेच दीपाला समजेना!


दीपाला एकदम लहानपणची मे महिन्याची सुट्टी आठवली– ती, नंदा, पोळ्यांच्या काकूंची मुक्ता आणि तिची आतेबहीण स्नेहा – चौघीजणी. दीपा आणि ती एकाच वर्गात – सगळ्या मैत्रिणी एकत्र डबा खायच्या. मुक्ता थोडी दूर राहायची. दीपा तिला ओढून आणायला पाहायची– पण व्यर्थ ! एकदा दीपा हट्टाने तिला म्हणाली ''हे गं काय मुक्ते, तू नाही तर मीच आज येते तिकडे डबा खायला! मुक्ता थोडी

**अदृष्टाशी बोलण्याचा वसा घेतलास पोरी, आता तुटेल जगाशी तुला बांधणारी दोरी.**

बावरली. दोघी डबा खायला बसल्या. मुक्ताच्या डब्यात नुसतीच भाकरी-चटणी. तर दीपाच्या डब्यात पोळी भाजी बरोबर दोन लाडू; झालंच तर छोट्या सुट्टीसाठी वेगळा छोटा डबा-त्यात चिवडा-केक! दीपाने मोठ्या हौशीने मुक्ताच्या डब्यातली भाकरी खाल्ली, पण मुक्ता मात्र शेवटपर्यंत नाहीच खुलली.

कधी मैत्रिणीचा सिनेमाला जाण्याला बेत व्हायचा. एस्.एस्.सी. परीक्षेच्या आधी, दीपाची आई मुक्ताला राहायला बोलवायची. दीपाला नको असलेली तिची गाईड्स, पुस्तके मुक्ता वापरायची. संध्याकाळी अभ्यासाला कंटाळून दीपा मैत्रिणींबरोबर फिरायला जायची त्याचवेळी मुक्ता तिच्या घरी अभ्यास करत बसायची. तेव्हा दीपाला या गोष्टीचं गांभीर्य कळायचं नाही. शाळेची सहल अगदी जवळ असली तरीही मुक्ता नसायचीच. सुरुवातीला दीपा तिला आग्रह करायची. पण मग हळूहळू तिच्या न येण्याचा अर्थ दीपालाही समजू लागला. आपला अभ्यास, मैत्रिणी, निरनिराळे उपक्रम, या सगळ्यात दीपा दंग होती आणि मुक्तापासून मात्र नकळत ती दूर होत गेली. मात्र आजचं मुक्ताचं आत्मविश्वासपूर्ण रूप पाहाताना तिला खूप आनंद झाला. एकत्र हुंदडणाऱ्या चौघी, हळूहळू चारदिशांनी कधी गेल्या - वाटा कधी वेगळ्या झाल्या ते समजलंच नाही. आता नंदा समोर आली ती अशा रूपात.

त्यानंतर दोनच दिवसांनी मुक्ता तिला भेटायला आली. नुकतीच



बी.कॉम. झाली होती बाहेरून परीक्षा देत! एकीकडे एका कारखान्यात नोकरी चालू होती.

''मुक्ते, आता काय गं पुढे विचार?''

''दीपा, आता कॉम्प्युटरचा कोर्स करते आहे. मग बघूया आणखी चांगली नोकरी कुठे मिळाली तर.'' दीपाला जरा आश्चर्यच वाटलं. कॉम्प्युटरचा महागडा कोर्स करणं, मुक्ताला कसं काय जमतंय? तिने आईजवळ चौकशी केलीच.

''दीपा, काकूंच्या पोरी मोठ्या गुणाच्या! सारखी धडपड चाललीय. आतासुद्धा फीचा पहिला हप्ता भरायला माझ्याकडून पैसे नेले आणि उरलेली फी हप्त्याने, तिला मिळणाऱ्या पगारातून देते. सदा हसतमुख, दुसऱ्यांना मदत करायची तयारी.''

ही मुक्ता लहानपणापासून अशीच धडपडी. नंदासारखीच आईबरोबर त्यांच्याकडे यायची. बाबा काहीच काम करायचे नाहीत. आईला मात्र शिक्षणाचा ध्यास! लेकींनीही तोच वारसा घेतला. अभ्यास-घरकाम-अभ्यास या चक्रात त्या अडकलेल्या.

दीपाला काही प्रसंग लख्ख आठवत होते. एकदा काय झालं मुक्ताच्या हातून एका मुलीची पाटी फुटली. ती लागली डाफरायला - 'माझी पाटी दे भरून!' मुक्ता इतकी घाबरली - कुठून देणार पाटी भरून! आपलीच शाळा बंद नाही ना होणार? किती दिवस तिचा जीव धसकलेला होता.

...आज दीपाच्या आतेबहिणीचं, स्नेहाचं लग्न होतं. नुकतीच इंजिनियर झाली होती ती. खूप श्रीमंत, हुशार, देखणा नवरा मिळाला या आनंदात गर्क होती. लग्नातला थाटमाट तर विचारूच नका; साड्या-दागिने, मेकअप, देणीघेणी याच्याच गप्पा तिच्या मैत्रिणींच्यात चालू होत्या. लहानपणापासून स्नेहा अशीच! स्वत:त मग्न असलेली. दीपाची मुक्ता, नंदाबरोबरची मैत्री तिला आवडायची नाही. इंजिनियर होऊनही स्नेहाला काहीच करण्याची इच्छा नव्हती. डोळ्यांसमोर कोणतंच ध्येय नव्हतं. आरामशीर राहावं; जीवाला काही तोशीश नको, एवढ्यातच ती खुश होती. दीपाचा जीव गुदमरायला लागला. ही स्नेहा तिची केवळ बहीणच नव्हे तर लहानपणापासूनची सखी -

**पोरी, आभाळ चालणे नव्हे इतुके सहज। जाते पाऊल खुणांची लख्ख पुसून ओळख।**

एकत्र भातुकली खेळायच्या – पण बघताबघता दोघींची विश्वं किती वेगळी होत गेली...

सरकारी रुग्णालयात काम करताना अनेक स्त्रीरुग्ण दीपाला भेटत होत्या. त्यांची सामाजिक स्थिती, आजार, अज्ञान तिला अस्वस्थ करीत होतं. अजून तिच्या कामाची दिशा निश्‍चित नव्हती, तरी समोर अनेक क्षितिजं खुली होती.

आज स्नेहाच्या लग्नात दीपा खूप अस्वस्थ होती. आम्ही चार घरच्या चार मैत्रिणी... चार मार्गावर चालतो आहोत. मनातला गुंता वाढतच होता. नंदाच्या स्थितीला परिस्थिती कारण होती; तर मुक्ता परिस्थितीवर स्वार होऊन पुढे चालली होती. स्नेहाला सर्व काही उपलब्ध आहे. पण ते वापरण्याची तिची इच्छाच नाही. दीपाचं साधं राहाणं, तिच्या बरोबरीच्या मैत्रिणींचे जे गप्पांचे विषय असायचे, त्यात फारसं न रमणं सगळ्यांच्या चेष्टेचा विषय असायचा. पण आपल्याला नक्की काय करायचंय, हे तिला पक्कं कळलेलं होतं. पैसा नाही मिळाला तरी चालेल... जे काम करायचं त्यात पुरेपूर समाधान मिळालं पाहिजे; शेवटी आपल्या आनंदाचं निधान आपणच शोधायला हवं – हे तिला पक्कं कळलं होतं. त्यामुळे भोवतालच्या गलबलाटात ती ठामपणे, शांतपणे वावरत होती आणि गंमत म्हणजे तिचं तिला कळलं नाही तरी चारजणींच्यात तीच उठून दिसत होती.

**शैलजा देशमुख**
बी–७/५ गुरूराज सोसायटी,
पद्‌मावती, पुणे ३७.

---

# मी मुलगा/मुलगी आहे म्हणून...

**– ज्योती कानिटकर**

'८ मार्च' च्या निमित्ताने, आठवी आणि नववी, या वयोगटातल्या मुला–मुलींना बोलतं करावं, असं मनात आलं. त्यासाठी ज्ञान प्रबोधिनीतील इयत्ता नववी मधील मुले आणि मुली यांना एकत्र बोलावून त्यांच्याशी गप्पा मारण्याचा कार्यक्रम केला. खरंतर, या सर्वांनीच गप्पा मारल्या आणि आम्ही म्हणजे मी आणि अनघाताई लवळेकर यांनी ऐकण्याचं आणि अधून मधून प्रश्न विचारण्याचं काम केलं. गप्पांसाठी विषय दिला होता. 'मी मुलगी आहे म्हणून... मी मुलगा आहे म्हणून...'

हा विषयच असा होता की मुले आणि मुली दोघांनी समोरासमोर एकमेकांशी गप्पा मारणं जरुरीच होतं. त्यामुळे त्यांना एकमेकांचे स्वभाव, विचार, मतं, वर्तन, काम करण्याची पद्धत इत्यादींबद्दलचे विचार कळू शकले आणि त्याचबरोबर प्रतिक्रियाही व्यक्त करण्याची, तसंच स्वत:ला जास्त समजून घेण्याची संधी मिळाली, असं वाटतं. प्रत्येक वेळी दुसऱ्या गटातील व्यक्तीने व्यक्त केलेलं मत पटेलच असं नाही, पण त्यामुळे विचारप्रक्रियेला गती निश्‍चितच मिळते.

विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रियांमध्ये दोन भाग स्पष्ट दिसत होते. एक म्हणजे मी मुलगी आहे म्हणून... या विषयासंदर्भात त्यांनी आपल्या प्रतिक्रिया मोकळेपणाने नोंदवल्या. त्यामध्ये स्वभावत: असणारे भेद, शारीरिक क्षमता, सामाजिक दृष्टिकोन यामुळे येणाऱ्या मर्यादा, तर काही वेळा मिळणारे फायदे याविषयी मोकळ्या प्रतिक्रिया मुले व मुली दोघांनीही मांडल्या. तर दुसरा भाग म्हणजे सामान्यत: मुलगा/मुलगी या गटांविषयीची परस्पर निरीक्षणे व स्वत:च्या वैयक्तिक अनुभवातून त्यांचे बनलेले मत त्यांनी नोंदवले. त्यातील काही प्रातिनिधिक प्रतिक्रिया–: उशीरा घरी येण्याबद्दल मुलींना जास्त रागावले जाते. मुलींची जरुरीपेक्षा जास्त काळजी घेतली जाते. त्याचा काही वेळा गैरफायदाही आमच्याकडून घेतला जातो. मुलांपेक्षा आमची शारीरिक क्षमता काही वेळा कमी पडते, अशी निरीक्षणे मुलींनी मोकळेपणाने नोंदवली.

तर मुलांच्यात काटकपणा जास्त असतो, मुलांकडून अपेक्षा जास्त केल्या जातात. रुढ कल्पनांमुळे मुलांना भावना व्यक्त करता येत नाहीत, मुलींपेक्षा शारीरिक शिक्षा जास्त मिळते, अशी मुलांची निरीक्षणे होती.

मुलगी किंवा मुलगा असणं याविषयीची काही वैयक्तिक निरीक्षणेही नोंदवली गेली. उदा. मुलींना भांडणे

**हे दिवेलागणीआधी, अवकाश हळू झाकळते, मज आईच्या वासाचे, आयुष्य पुन्हा आठवते.**

विसरता येत नाहीत, मुले आपल्या कामात चटकन गुंततात, मुलींना आपल्या भावना चटकन व्यक्त करता येतात कारण त्यांच्याजवळ संवेदनशीलता अधिक असते, असे मुलींना तसेच मुलांनाही वाटते. काही मुलांना-मुलगे जास्त रागीट असले तरी मनाने मोकळे असतात, भांडणे लवकर विसरतात, मात्र त्यांच्याजवळ संयम कमी असतो, असे वाटते.

काही मुद्यांवर दोन्ही गटांचे एकमत होते, काही वेळा मोकळी गुणग्राहकता होती, तर कधी जोरदार विरोधी प्रतिक्रिया होत्या.

मुलांचं असं निरीक्षण होतं की, मुली जबाबदारीने काम करत नाहीत किंवा आपणहून जबाबदारी स्वीकारत नाहीत. या मुद्याला अर्थातच मुलींनी जोरदार आक्षेप घेतला. हा सर्वच संवाद अगदी हसत खेळत झाला. एकजण म्हणाली, ''आम्ही मुली आहोत त्यामुळे आम्हाला कपड्यात जास्त विविधता मिळते.'' यावर एकाने मिष्किलपणे उत्तर दिले, ''आमच्या कपड्यात विविधता नसल्यामुळे आमची खरेदी लवकर होते.''

एकूणच खेळीमेळीत पार पडलेल्या या परिसंवादात मुलगे व मुली दोघांनीही अगदी मोकळ्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. तुमच्या स्वत:च्याही याविषयावर, खास तुमच्या अशा प्रतिक्रिया असतील. त्याविषयी प्रकट लेखन वा चर्चा करा. यातून काही भाग परस्पर समजूत वाढण्यास पूरक तर काही गैरसमज दूर करायला पूरक होण्याची शक्यता असते. म्हणून 'मी मुलगी/मुलगा आहे म्हणून...' याविषयी तुमचे स्वत:चे अनुभव व प्रतिक्रिया आम्हाला जरूर कळवा.

**ज्योती कानिटकर**
७ सेवानंद अपार्ट.,
८९२ सदाशिव पेठ, पुणे ३०

**पालक/अभ्यासक यांच्यासाठी विशेष सूचना**
या विषयावरील चर्चा/परिसंवाद विद्यार्थ्यांच्या गटासाठी आयोजित करा व त्यातील निरीक्षणे **'छात्र प्रबोधन'** ला जरूर कळवा.

**ज्ञान प्रबोधिनीद्वारा - मे व जून १९९८ मध्ये प्रशिक्षण वर्ग! इ. ८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी व त्यांच्या पालकांसाठी**

**विद्यार्थ्यांसाठी**

**१. स्वयंअध्ययन कौशल्ये प्रशिक्षण वर्ग :** (६ दिवसांचा, रोज दु. २ ते ६, तुकडीचा प्रारंभ ४, ११, १५, २५ मे व १ जून ९८, शुल्क रु. १५०/-) स्वत: अभ्यास कसा करावा? हे आधुनिक तंत्रे, चाचण्या, सराव पाठ यांच्या साहाय्याने शिका. वाचन, श्रवण, स्मरण, लेखन, टिपण व नियोजन अशी सहा कौशल्ये! (मराठी व इंग्रजी-माध्यमांच्या स्वतंत्र तुकड्या)

**२. इंग्रजी संप्रेषण कौशल्य :** (६ दिवसांचा, रोज दु. २ ते ६, तुकडीचा प्रारंभ ४, १११, १८, २५ मे व १ जून ९८, शुल्क रु.१५०/-) (Development English Communication Skills) : हल्लीच्या पाठ्यपुस्तकांतून संप्रेषण कौशल्यावर भर दिलेला आहे. त्या दृष्टीने इंग्रजीचे लेखन, संभाषण, वाचन यात सुधारणा कशी करता येईल, याचे मार्गदर्शन या वर्गात केले जाईल. (फक्त मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी)

**३. प्रतिभा विकसन वर्ग :** (६ दिवसांचा, रोज दु. २ ते ६, वर्गाचा प्रारंभ : १८ मे व १ जून ९८, शुल्क रु. १५०/-) पाश्चात्त्य देशांमध्ये शिकवली जाणारी प्रतिभा विकसनाची आधुनिक तंत्रे आत्मसात करतानाच आपली निरीक्षण शक्ती वाढवा! कल्पना शक्तीला पंख फुटू द्या! सर्जनशीलतेचा आनंद लुटा! (इंग्रजी व मराठी माध्यम एकत्र) फक्त दोनच वर्ग.

**४. लेखन कौशल्य प्रशिक्षण वर्ग :** (६ दिवसांचा, रोज स. ९ ते १२ ।।, वर्गाचा प्रारंभ-सोम. दि. ४,११,१८,२५ मे व १ जून ९८, शुल्क रु. १५०/-) निबंध लेखन, पत्र लेखन, कल्पना विस्तार, सारांश लेखन इ. अवघड वाटणाऱ्या लेखनातील गोष्टी सरावासहित शिकण्याची संधी (फक्त मराठी माध्यम)

**पालकांसाठी**

**१. स्वयंअध्ययन मार्गदर्शन वर्ग :** ज्यांचे पाल्य माध्यमिक शाळेत शिकत आहेत, त्यांच्यासाठी, आपल्या पाल्याने अभ्यास करावा, याचे मार्गदर्शन करणारी मराठी व्याख्याने, दोन दिवसांचा फक्त एकच वर्ग! शुक्र. दि. २९ व शनि. दि. ३० मे, दु. २।। ते ६ शुल्क रु. ७५/-

वरील सर्व वर्ग ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे येथे होतील. बाहेरगावच्या विद्यार्थ्यांनी निवास-भोजन व्यवस्था आपापली करावी.

**नाव नोंदणी -** छात्र प्रबोधन कार्यालय, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० येथे कार्यालयीन वेळेमध्ये होईल.

**जरी आंधळी मी, तरी मला दिसले प्राक्तन, काळोखाच्या केवड्याला, फुटे प्रकाशाचे पान.**

# राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र

**– र. म. खाडे**

***कुठल्याही विषयाची किंवा गोष्टीची माहिती आपल्याला कायमच हवी असते. आपल्याला हवी असलेली माहिती जर तयार, आयतीच मिळाली तर त्यात जास्तच सुख असते. पण ही आयती माहिती मिळायलाही आधी ती कोणाला तरी गोळा करायलाच लागते. पूर्वी ही माहिती मिळविण्यासाठी अनेक साधनांचा उपयोग केला जायचा. पण जस–जसे मानव प्रगतीचे नवे टप्पे यशस्वीरित्या पार करायला लागला, तशी ही साधने अपुरी पडायला लागली. संगणकामुळे तर माहिती–तंत्रज्ञानाला संपर्काची एक वेगळीच दिशा सापडली आणि सध्या आकाशात झेपावणाऱ्या नव्या प्रगत उपग्रहांमुळे तर अनेक नव्या दिशांची दालने मानवाला खुली झाली. सरकारी क्षेत्रातही, संगणकाच्या तंत्रज्ञानाचा उपयोग व्हावा या दृष्टिकोनातून, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (N.I.C.) या संस्थेची स्थापना करण्यात आली. या संस्थेचे नेमके कार्य काय? ते कसे चालते? याबद्दल आपल्याला माहिती देत आहेत, या संस्थेतील श्री. र. म. खाडे.***




**मा**नवाच्या प्रगतीचा विचार करीत असताना पाषाणयुग, औद्योगिक क्रांती व सध्याचे माहिती तंत्रज्ञान हे तीन महत्त्वाचे उत्क्रांतीचे टप्पे दिसतात. माहिती तंत्रज्ञान – Information Technology हा विषय अतिशय आधुनिक आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या दोन बाबींचा विकास गेल्या अर्धशतकातच झाला. त्या दोन बाबी म्हणजे संगणक व संदेश दळणवळण तंत्रज्ञान (Computer and Communications) याच्या जोडीने उपग्रह दळणवळण (Satellite Communication) चा ही विकासही झपाट्याने होत आहे.

कोठल्याही संस्थेला, कारखाना किंवा कार्यालयाला कामातील सुलभता, वेग व त्यातील काटेकोरपणा, या गोष्टी माहिती तंत्रज्ञानाने फारस सुलभ होत गेल्या आहेत. संगणक ही आता टंकलेखनासारखी आवश्यक बाब बनली आहे. संगणकाचा कामाचा वेग, त्याची माहिती हाताळण्याची क्लृप्ती या महत्त्वाच्या गोष्टींमुळे सर्वच क्षेत्रात त्याचा वापर वाढत आहे. रेल्वेचे, विमानाचे आरक्षण असो वा बसचे. संगणक हा त्यातील एक आवश्यक घटक बनला आहे. त्याच्या उपयोगामुळे कामात गती येऊन सर्वसाधारण जनतेला फायदा होत आहे.

या सर्व गोष्टी वेगवेगळ्या स्तरांवर वापरात येऊ लागल्या व त्यात खूपच प्रगती होत गेली.

या अतिशय उपयुक्त अशा संगणकाचा वापर सरकारी क्षेत्रांत व्हावा, या उद्देशाने दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी, राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (National Informatics Centre) या सरकारी संस्थेच्या स्थापनेस मान्यता दिली व त्याला प्रोत्साहन दिले. १९८० च्या सुमारास अशा प्रकारे, प्रथम दिल्ली मध्ये रा.सू.वि. केंद्राची स्थापना झाली. त्याचे प्रमुख म्हणून, यातील तज्ज्ञ श्री. एन. शेषगिरी राव यांनी काम हाती घेतले. प्रथम त्यांनी, दिल्लीतील सर्व केंद्रीय कार्यालयांमध्ये संगणक प्रणाली सुरू केली. त्यासाठी NEC-1000 हा प्रचंड महासंगणक बसविला गेला व त्याच्या Terminals द्वारे ही विविध

**संझेच्या पैलतटी मी अंधार ओंजळी भरते, अन् ऐलतटाला कविता शब्दात उजाडत जाते.**

कार्यालये या महासंगणकाला जोडली गेली. त्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रगत प्रशिक्षण देण्यात आले व संगणकाचा सुसूत्र वापर सर्व केंद्रीय कार्यालयात सुरू झाला.

या कार्यालयातील प्रचंड यशामुळे व उपयुक्ततेमुळे, अशी ३ मोठी केंद्रे, पुणे हैद्राबाद व भुवनेश्वर येथे १९८५–८६ मध्ये उघडण्यात आली. तेथे NEC - 1000 हा महासंगणक बसविण्यात आला. याचा वापर तेथील राज्य सरकारी कार्यालयांसाठी सुरू करण्यात आला. मे ८६ मध्ये पुण्याच्या केंद्रात 'मी' हे कार्य सुरू केले. पुण्यातील विविध राज्य कार्यालये, इतर संस्था यांना या प्रकारे महासंगणकाचा वापर करण्याची सुविधा प्राप्त झाली. १९८८ मध्ये श्री.पी. चंद्रशेखर व १९९५ मध्ये श्री. दि. पु. बोण्डे यांनी येथील संचालक पदाचा कार्यभार स्वीकारला.

रा. सू. विज्ञान केंद्रामध्ये विविध राज्य, केंद्र व स्वायत्त कार्यालयांना प्रगत प्रशिक्षण देण्यात येऊ लागले. प्रगत शिक्षणाचे दोन मुख्य भाग आहेत. एक म्हणजे संगणकाचे आकलन व त्यावरील प्रत्यक्ष अनुभव, याचा उपयोग करून त्यांच्या स्वत:च्या कार्यालयातील संगणकावर काम करता येणे शक्य व्हावे. हल्ली संगणक प्रणाली खूपच प्रमाणात वापरात येत आहे.

दुसरे शिक्षण म्हणजे सॉफ्टवेअर प्रणालींची माहिती व त्यांचा वापर करण्याचे ज्ञान. या प्रणालीचे सविस्तर शिक्षण प्रशिक्षणार्थींना देण्यात येते. गेल्या दीड महिन्यापासून अशा प्रकारचे प्रशिक्षण, जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांना त्यांच्या जिल्ह्यातच सुरू करण्यात आले आहे व तेथे बसविण्यात आलेल्या संगणकाचा वापर, हेच कर्मचारी त्यांच्या दैनंदिन कामांमध्ये करू शकणार आहेत. संगणकावरील विविध प्रणाली (programmes) विकसित करण्यात आली व संगणकाचा वापर वाढू लागला. माहितीचा अद्ययावतपणा, वेगवेगळ्या खात्यातील माहिती संकलनाद्वारे करण्यात करण्यात येतो. उदाहरणार्थ, शिक्षण खात्यामार्फत शालेय शिक्षणाबाबतचा आढावा मोठ्या प्रमाणात घेतला गेला व ही सर्व माहिती संगणकावर भरण्यात आली. या माहितीचा उपयोग, त्या खात्यास व इतर संलग्न खात्यास व त्यामध्ये कार्य करणाऱ्या इतर शैक्षणिक संस्थांनाही होऊ शकतो. कृषी खात्यातील, पंचवार्षिक पिकवार माहितीचे संकलनही संगणकावर करण्यात येते. विविध परीक्षामंडळे, दूरध्वनींची बिले वगैरेंनाही संगणक प्रणालींचा अतिशय लाभ होत आहे. त्यांच्या या प्रचंड कामांमध्ये वेग, अचूकता व सुसूत्रता येत आहे.

सन १९८६ मध्ये, रा. सू. वि. केंद्राने एक महत्त्वाचे पाऊल उचलले. ते म्हणजे राष्ट्रातील सर्व म्हणजे ४८० जिल्हा कार्यालयांमध्ये संगणक सुविधा पुरविण्यात आल्या. ही सर्व केंद्रे उपग्रह दळणवळणाने एकमेकांस जोडली गेली व अशा प्रकारे संगणक व उपग्रह दळणवळणाद्वारे सरकारी, निमसरकारी कार्यालयांच्या कामात क्रांतीच घडून आली.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील इंटरनेटचा वापर रा. सू. वि. केंद्राच्या NICNET उपग्रह दळणवळण यंत्रणेमार्फत करता येतो. अशा प्रकारचा वापर करण्याची सुविधा महाराष्ट्रात व सर्व देशांत जिल्हास्तरांवर करण्यात आली आहे. ही सुविधा सरकारी, निमसरकारी कार्यालये व शैक्षणिक संस्थांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामध्ये E-mail ची सुविधा देखील आहे.

नुकतेच पुणे, मुंबई व नागपूर येथे Video Conferencing ची सुविधा सुरू करण्यात आली आहे. याचा उपयोग प्रत्यक्ष एका जागी न जमता आपापल्या गावात राहूनही एकमेकांशी संवाद करता येतो. म्हणजेच, प्रत्येकजण आपल्या कार्यालयात बसून समोरच्या टेबलावरील संगणकाच्या साहाय्याने परस्परांशी संवाद साधू शकतो. इतकंच नव्हे तर सर्वजण त्या संगणकाच्या पडद्यावर एकमेकांना दिसू शकतात.

लहानशा Personnel Computer-PC ची क्षमता व उपयुक्तता फारच आढळल्याने, सन १९९० नंतर हळूहळू मोठ्या संगणकाऐवजी त्याचा वापर वाढत गेला. रा. सू. वि. केंद्राने यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली व सरकारी क्षेत्रामध्ये सध्या PC संगणकाचा वापर अतिशय मोठ्या प्रमाणात व सुलभतेने करण्यात मोठा हातभार लावला. जिल्हा पातळीवर देखील असे PC वापरात येऊ लागले व संगणकाचा प्रसार झपाट्याने होऊ लागला.

या प्रकारे रा. सू. वि. केंद्र कार्यरत आहे व पुढील काही वर्षांमध्ये त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत जाणार आहे.

••

**श्री. र. म. खाडे**
राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र,
गणेश खिंड रस्ता, पुणे ७.

**केळीच्या मांडवात। रंग हळदीचे दंग झाले। हिरवे पान माझ्या। मना मनाचे ऊन प्याले।**

# एकट्याची होळी

– गणेश दिघे

'होळी रे होळी पुरणाची पोऽऽळी' म्हणत आरोळ्या ठोकताना लहानपणी बोंबाच का ठोकायच्या हा प्रश्न कधी पडला नाही. मात्र पंधरा-वीस वर्षांपूर्वी नकळत ह्या प्रश्नाचं उत्तर मिळालं होतं. झालं काय, की आम्ही ज्या चाळीत राहायचो तिथल्या मुलांनी रिवाजाप्रमाणे त्या वर्षीही सार्वजनिकरित्या होळी करायचं ठरवलं. त्याची वर्गणी वगैरे त्यांनी जमा केली. दोन तीन दिवसांपूर्वी चाळीतल्या मुलांचं आणि माझं भांडण झालं होतं, कशावरून? तर क्रिकेटच्या एका मॅचमध्ये त्यांनी मला खेळायला घेतलं नव्हतं. अर्थात मी काही कांबळी किंवा कुरूविला नव्हतो पण चेंडू बिंडू अडवायचो. खेळता येत नसलं तरी संघातून डावलण्याचं दु:ख झोंबायचंच वय ते. त्यामुळे त्यांच्याशी अबोला धरलेला. सबब त्यांनी होळीसाठी आमच्याकडून वर्गणी घेतली नाही. झालं! आमच्या डोक्यात भुंगा शिरला. तुमच्यापेक्षा मोठ्ठी होळी करून दाखवतो. रागाच्या भरात वडिलांकडे गेलो, ''नाना मला दहा रुपये द्या!''

''कशाकरता?'' ''आपली स्वतंत्र होळी करायची म्हणून.'' ''अरे पण स्वतंत्र कशाला? चाळीची आहे ना?'' मग मी नानांना सगळा इतिहास सांगून टाकला. माझ्या वडिलांचं एक होतं, ते कधी मला अक्कल वगैरे गोष्टी थेरॉटिकली शिकवायचे नाहीत. 'प्रॅक्टिकल एक्सपिरिअन्स'वर त्यांचा अधिक जोर. एखादी गोष्ट चुकीची असेल तर त्याबद्दल मी काय करतो पाहायचे आणि चूक झाली की म्हणायचे, ''काय जम्या, आत्ता कळलं ना!'' आणि मग तात्पर्य सांगायचे, मग ते अगदी पंचतंत्रातल्या गोष्टीप्रमाणे असायचे. उदा. खोटे बोलू नये, एक खोटं लपवायला शंभर वेळा खोटं बोलावं लागतं, वगैरे.


नानांकडे मी दहा रुपये मागितले. मात्र त्यांनी पंधरा रुपये देऊन माझा आनंद द्विगुणीत केला. झालं मग गोवऱ्या आणायला गोणपाट शोधणं, ते सायकलला अडकवणं, गवळीवाड्यात जाऊन गोवऱ्या ठरविणं, त्या घेणं, सायकल सांभाळत घरी येणं, पुन्हा लाकडांसाठी वखारीत जाणं, दुकानावरून गुलाल, बुक्का, नारळ, नागिणीची पानं, रांगोळी, तत्सम सगळा 'शौकसौदा' जमा करता करता अंधार पडला. चाळीतल्या पोरांची होळी भोवती झुंबड उडालेली. त्यांची होळी रचून तयार. मला गोवऱ्या रचायला काही जमेनात तेव्हा नानांच्या मदतीनं रचणं सुरू केलं. नानांनी होळी रचून दिली आणि म्हणाले, ''अरे जम्या होळीला एरंड लागतो तो कुठंय?'' आली का पंचाईत! एरंड मी आणलाच नव्हता.

संध्याकाळी झाडाचं पानही तोडू नये, हा आमच्या मातोश्रींनी लहानपणी केलेला संस्कार विसरून, मी ज्यांच्याशी भांडण झालं होतं, त्या 'कॅप्टनच्या' दारातल्या एरंडाची एक फांदी आणली. डोक्यात राख धुमसत होती ती चाळकरी दोस्तांबद्दलच्या रागाची. त्यामुळं त्याच्याच दारातून खुन्नस म्हणून मी एरंडाची फांदी आणली. मात्र ह्या वेळी नानांनी होळी मलाच रचायला लावली. मग नानांनी यथासांग पूजा केली. मला होळी पेटवायला सांगितली. मी पेटवली. सार्थ अभिमानानं छाती फुगवून चाळीच्या खालच्या बाजूला चाललेल्या होळीकडे पाहू लागलो. त्यांची अजून तयारीच चालली होती. नानांनी सांगताच थोरल्या बहिणीनं आणि नानीनं पूजा वगैरे केली.

नानांच्या सांगण्यावरून मी होळीला पाणी पाजू लागलो. तीन फेऱ्या मारायच्या. होळीचे पाय धुवायचे, नमस्कार करायचा आणि बोंब मारायची. नानांचं पौरोहित्य चालू होतं. मी एक फेरी मारली. खालच्या होळीकडं पाहिलं. त्यांची सगळी तयारी झालेली, पण पूजा सांगायला भटजी आले नसल्याने, त्यांची होळी काही पेटली नव्हती. माझ्या मनात धगधगणाऱ्या बदल्याची आग आता समाधानाने हुळहुळू लागली. हातातल्या तांब्यातल्या पाण्याची धार होळीभोवती शिंपीत, मी दुसरी फेरी पूर्ण केली. आता मला 'हम भी कुछ कम नहीं' असं काहीसं वाटू लागलं. माझ्या होळीच्या पिवळ्या ज्वाळांच्या छबी, चाळीच्या भिंतीवर नाचू लागल्या. जणू

**अशी उतू आली माती, जसे वाळ्याचे अत्तर, तिच्या चंदनाची रेघ, माझ्या मेघ भाळावर.**

त्या मुक्या ज्वाळाही माझ्या विजयाचा उन्मादच साजरा करीत होत्या. चाळकरी पोरांचे चेहरे मुंगीच्या तोंडाएवढे झाले. त्यांचा भटजीबुवा अजून आला नव्हता आणि मी मनातून होळीला प्रार्थना करीत होतो. ''हे होळी आई, त्यांच्या भटजीची सायकल पंक्चर होऊ दे. त्यांचा भटजी येऊच नये असा काही चमत्कार कर. तुला पुढच्यावर्षी दहा खोबऱ्याच्या वाट्या वाहीन.'' मी तिसरी फेरी मारली. होळीचे पाय धुतले. पुन्हा हात जोडून डोळे मिटून मनोभावे होळी आईला साकडे घातले, ''होळी आई त्यांच्या भटजीला येऊ देऊ नकोस. तुला पुढच्या वर्षी...''




नानांनी डोक्यात टप्पल मारली. ''हं जम्या आता बोंब ठोक...!'' मी मुठी जुळवून बोंब ठोकली आणि लाजेनं खजील व्हावं असंच झालं.

एखाद्या खोल विहिरीतून एखाद्या बेडकानं 'डराऽऽव डूऽऽक' करावं असा काहीसा विचित्र प्रकार आपण करतोय असं जाणवलं. माझी एकलकोंडी बोंब ऐकून पाठोपाठ चाळकरी होळीवाल्यांच्या टोळक्यात खोऽऽ खोऽऽ हशा झाला आणि माझ्या तळपायाची आग मस्तकात भिडली.

''जखमेवर मीठ चोळणं म्हणजे काय ते कळलं का जम्या?'' नानांनी खळखळून हसत सवाल केला. काय उत्तर देणार? कप्पाळ! हा नानांच्या 'प्रॅक्टिकल एक्सपिरिअन्स'चा धडा पचवणे मला अवघड झाले. खजील होऊन पाय आपटत मी घरात आलो. मी सोडून सगळ्यांचे चेहरे आतल्या आत हसत होते.

''अरे रागवायचं काय त्यात. एकट्याची होळी म्हटल्यावर एकट्यानं बोंब ठोकली तर बिघडलं कुठं? तू असं कर, सागर, पप्पू, बाळा यांना बोलावून आण आणि बोंबा मारा. मग बघ त्यांची कशी जिरेल!'' नानांचा हा सल्ला मला आवडला. लागलीच शेजारीच राहणाऱ्या मामांच्या घरात घुसून मी पप्पू, सागर, बाळाचं पेंढार घेऊन आलो. त्यांच्या परीक्षा असल्यानं मामांनी त्यांना बाहेर पाठवलं नव्हतं. ह्या तिघांचं वैशिष्ट्य म्हणजे त्यांचं भोकाड! आरडा-ओरडा करायला लागले तर मंडई भरवतील. घरातून बाहेर पडल्याने त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्यांना होळीसमोर उभे केले आणि म्हणालो,

''चला बोंबलाऽऽ'' एवढ्यात खालची होळी पेटली. चाळकरी पोरं मोठ्यानं बोंब मारीत

**सुख दुःखांच्या पल्याड कोणी गाणे हलके गाते, किति वर्षांनी श्वासासंगे फूल जिवाचे हलते।**

किंचाळली, ''होळी रे होळी पुरणाची पोळी, रावणाच्या पोटात बंदुकीची गोळी.''

आणि आतापर्यंत हाताच्या मुठी तोंडापर्यंत आणलेल्या पप्पू, सागर बाळानी बंदूकीच्या गोळीच्या वेगात खालच्या होळीकडे धूम ठोकली. मी त्यांचे बखोटे धरायचा प्रयत्न केला पण मला हूल देऊन ते त्रिकूट निसटले ते निसटलेच. खालच्या होळीला बाया-बापडे जमलेले, अगदी गर्दीच गर्दी झालेली तिथे. तिथे जाऊन ते त्रिकूट पकडून परत आणणे मलाच काय पण मामांनाही जमले नसते. अरभाटपणात ही चिल्लर भुताटकीच्याही पुढेच होती.

चाळकऱ्यांच्या होळीचा जल्लोष वाढत होता. मी चरफडलो. तडक घरात घुसलो. झाल्या देखाव्यानं चिडलो होतो. एवढ्यात खालच्या होळीची सामूहिक बोंब ऐकू आली. ''एकट्याच्या बैलालाऽऽऽ'' पाठोपाठ प्रतिसाद ''होऽहोऽ'' आणि बोंबाच बोंबा.

माझं नाव जरी त्यांनी घेतलं नसलं तरी ते मलाच म्हणताहेत, हे मी ओळखलं. दारात जाऊन खालच्या चाळीकडे डोकावलं तर मामाची चिल्लर भूतसेना माझ्या नावानं बोंबा ठोकणाऱ्यांना सामील. 'गण्याच्या बैलालाऽऽऽ' माझ्याकडे पाहून खाली वाकून मामाची चिल्लर माझी खिल्ली उडवीत होती. 'होऽऽऽ' नाना घरातून म्हणाले, ''गणपतराव आता तुम्हाला जे होतंय त्याला तळपायाची आग मस्तकात भिडणे असं म्हणतात.'' आता मात्र मला नानांचाही राग आला. मी म्हणालो, ''ह्या चिल्लरांना मीच घरातून बाहेर आणलं आणि ती आता माझ्या नावानंच बोंब ठोकताहेत.''

''बरोबर आहे याला म्हणतात मेरी बिल्ली मुझपर म्याँव!'' नानांचा एकूण मूड मी ओळखला. आपल्याला हे सगळं शिकविण्यासाठीच नानांनी 'एकट्याच्या होळी'ला एवढी मुक्तहस्ते मदत केली, हेही कळून चुकले. त्यांची शिकवायची पद्धतच अशी होती. आपली हार झाली आहे हे जाणवत होतं. पण ते मान्य होत नव्हतं. मी घरात येऊन मुळूमुळू रडू लागलो.

नानांनी मला जवळ घेतलं, ''जम्या, गाव करेल ते राव करू शकत नाही. काही गोष्टींचा आनंद समूहानं घ्यायचा असतो. एकट्याला तो कधीही लुटता येत नाही. सामुदायिक सण हे वैर घालवायला असतात, वाढवायला नसतात. पाहिलंस त्यांची होळी कशी मजेत चाललीय ते. ते ज्या बोंबा मारताहेत त्या तुला चिडवण्यासाठी नव्हे. तुझा राग, तुझ्या मनातलं वैर जावं म्हणून. होळीच्या बोंबात वैर संपवण्याची अफाट ताकद आहे. म्हणून तर आज सगळे बोंबलतात.''

''पण आमचं वैर संपणार कसं?'' मुळमुळत विचारलं. ''बोंबांनी. बाहेर जा आणि म्हण, ''माझ्या होळीला न येणाऱ्यांच्या बैलालाऽऽऽ आणि जीव खाऊन बोंब मार!'' मी अंगणात गेलो. खालची होळी यज्ञासारखी फुललेली आणि माझी शेकोटीगत गरीब, कुचंबलेली. मी जोरात ओरडलो, ''माझ्या होळीला न येणाऱ्यांच्याऽऽ खालून आवाज आला ''आमच्या होळीला न येणाऱ्यांच्याऽऽ'' थोडा वेळ घोषणायुद्ध झालं, एक, दोन, एक दोन करीत माझ्या होळीला पाच सहा जण सामील झाले. पाहता पाहता दोन होळींचे दोन गट झाले. दोन्हीकडून बोंबा-युद्ध सुरू झालं. जरा वेळानं खालची गँग वर आली. एकमेकांची नाव घेत खिजवणं सुरू झालं. एकट्याच्या होळीचं एकाकीपण संपलं. माझी होळी आमची होळी झाली. मगाशी गरीब दिसणाऱ्या शेकोटीचं रूपांतर, आपोआप होळीत झालं. आता नानाही आमच्यात आले, 'कळलं बोंबा कशासाठी ते!' असं मला सांगत त्यांनी आरोळी ठोकली, ''एकट्याच्या बैलालाऽऽ'', सगळ्या थोरा पोरांनी बोंब मारली, ''होऽऽऽऽऽ'' त्यात मीही होतो. अबोला तुटला, गट्टी जमली!

आणि मग सर्वांनी मिळून अनेकांच्या नावाने बोंबा ठोकल्या. दारू पिणाऱ्यांपासून, लाच खाणाऱ्यांपर्यंत अन् भुरट्या चोरांपासून भांडण लावणाऱ्यांपर्यंत, दुसऱ्याच्या दारात कचरा टाकणाऱ्यांपासून, फुकटच्या लंब्या चवड्या गप्पा हाकणाऱ्यांपर्यंत कोणाचेही नाव न घेता मारलेल्या बोंबा न झोंबता अनेकांपर्यंत पोहोचल्या. अशी बोंब पावली.

●●

**गणेश दिघे**
१३७, प्रेरणा, प्रतिष्ठान,
रामनगर, चिंचवड, पुणे १९.

**फेरा राहू दे, तेवढी जिद्द चालण्याची ठेव, जीव ठेवावा वाटेशी, असे पाऊल भेटव.**

# शहाणपणाची परंपरा

– सुभाष देशपांडे

नुकताच भोपाळला गेलो होतो. 'राष्ट्रीय मानव संग्रहालय' नावाच्या एका आगळ्यावेगळ्या म्युझियमने भारताच्या वेगवेगळ्या प्रांतांतून काही माणसं बोलावली होती. चर्चेचा विषय होता– ''पाणी वापरण्याच्या पारंपारिक पद्धती.'' हिमाचल प्रदेशातल्या लोकांनी सांगितलं, ''अहो, नैसर्गिक झऱ्याची स्थानं आम्ही जिवापाड जपली होती. त्यांची पूजा होत असे. गावात एखादी नवी सून आली, की तिची डोली थेट जलपूजनासाठी जायची.'' उत्तर खंडातील तरुण चळवळ्या मित्रांनी आपलं मत मांडलं, ''मोठ्या धरणांनी आमचे प्रश्न वाढतील, स्थानिक तळी खोदून आम्ही पर्याय उभा करतोय.'' राजस्थानी स्वयंसेवी संस्थांनी पारदर्शिका दाखविल्या. त्यात उतरत्या छपरावरचं पाणी घराच्या तळघरात टाकीत साठवणं यावर भर दिला. शिवाय, पायऱ्या-पायऱ्या असलेले पारंपारिक तलाव स्वातंत्र्यानंतर बुजवून टाकले गेले, अशी तक्रार केली. नारूची साथ पसरू नये म्हणून असे करणे भाग होते, असे एका गटाचे म्हणणे, तर रोगाच्या बहाण्याने आंतरराष्ट्रीय मदतसंस्थांनी आमच्या परंपरेवर जाणून-बुजून गदा आणली, असे स्थानिक लोकांचे म्हणणे.

महाराष्ट्राच्या प्रतिनिधींनी नाशिक जिल्ह्यातल्या फडपद्धतीचे पुनरूज्जीवन झाले पाहिजे, असे म्हणत पाणलोटक्षेत्र विकासात केलेले काम मांडले. तामिळनाडूतले प्रतिनिधी म्हणाले की, ''आमच्याकडे देवळे आणि तलाव यांचा अतूट संबंध होता. पाणीही शुद्ध राहायचे आणि भक्तीही व्हायची.'' एकूणच काय, जुन्या परंपरेचा उदोउदो बहुतेक लोकांनी केला.

पण मग त्या स्थानिक परंपरा नष्ट का झाल्या? किंवा उतरणीला का लागल्या आहेत? त्यावर उत्तर आले, ''आपला पाण्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला आहे! जे पवित्र तीर्थ म्हणून घेत होतो, ते आता शुद्ध पाण्याच्या नावाखाली प्लॅस्टिकच्या बाटलीतून विकत घेतो– प्रसंगी दुधापेक्षा महाग दराने!''

'जुनं ते सोनं' म्हणण्याची एक अजागळ पद्धत आपल्याकडे आहे. जे जे प्राचीन, त्याबद्दल अभिमान बाळगायचा, एवढीच प्रवृत्ती. जुन्यातले चांगले काय होते, ते कशामुळे चांगले झाले, आज त्यातले काय कालोचित आहे, कोणती तत्त्वे आज अंगीकारली पाहिजेत, याबद्दल रामा शिवा गोविंदा. चर्चा होत नाही.

''हा सगळा तुमच्या इंग्रजी शिक्षणाचा परिणाम...'' एकाने तोफ डागली. ''परंपरेवर बोलताय आणि फर्ड्या इंग्रजीची जणू स्पर्धा लागल्यागत वेळ घालवताय. देशी भाषेत बोला की!'' त्याने आग्रह धरला. ''अहो, येथे दक्षिणेतली बरीच माणसं जमली आहेत त्यांना हिंदी कळत नाही, म्हणून आंग्ल भाषेचा वापर करीत आहोत.'' विद्वानांनी खुलासा केला. मग देवेगौडांसारखं हिन्दी शिका की – पहिल्यानं टोला मारला.

भाषेच्या मुद्यावरून गाडी परंपरेकडे वळली. ''धर्माची आणि संस्कृतीची गल्लत करू नका.'' मध्यप्रदेशातले एक अधिकारी कडाडले. पवित्र आहे म्हणून तलावातले खराब पाणी पिणं जसं चूक आहे, तसंच पैसे टाकले की पाणी मिळतं, ही पाण्याकडे बघण्याची दृष्टीही चूक आहे. पूर्वी देवराया होत्या म्हणून तेवढी झाडं तुटत नव्हती, आता त्याच-त्याच जागी वृक्षारोपण करून थकलात, तरी जंगल पुरेसं वाढत नाही. याचं कारण झाडाकडे बघण्याची दृष्टी बदलली. वटसावित्रीला नव्या स्वरूपात कसं बनवता येईल हा प्रश्न आहे. तुळशीवृंदावनाला पूजेचं तीर्थ वाहाणं हा दिनक्रम मराठी चित्रपटापुरता उरला आहे–तेसुद्धा जुन्या चित्रपटात.

जे जे समाजाला उपयोगी, कुटुंबाला आणि व्यक्तीला आरोग्यदायी आणि स्वास्थ्यकारक ते ते धर्माचा भाग बनवून टाकायचं, अशी आपली जुनी परंपरा. जुने म्हणजे कालबाह्य अशा शिक्षणात आपण वाढतो. त्यामुळे आई-वडील जुन्या वळणाचे झाले; पण त्यांची प्रकृती उत्तम आणि आपली खराब हे कशामुळे झाले?


आपण परंपरेला झिडकारतो म्हणून. सूर्यनमस्कार जुने वाटतात, तर आधुनिक 'जिम' मध्ये जा, पण व्यायामाचे तत्त्व महत्त्वाचे. गंगामाई म्हणून एकीकडे स्नानासाठी धडपडायचे, तर दुसरीकडे सगळ्या मुलखाचं सांडपाणी तिच्यात सोडायचं, ही दोन्ही टोकंच आहेत. 'शुद्ध' गंगेकाठी आरोग्यसंपन्न आयुष्य घालविता यावं म्हणून तिला 'पवित्र' म्हटलं. त्यातून ती 'उदात्त' वाटते. अगदी पंडित नेहरूंना आपल्या अस्थी गंगेत विसर्जित व्हाव्यात असे आकर्षण वाटण्याइतका शहाणपणा परंपरेतही असतो, हे विसरता कामा नये.

●●

**सुभाष देशपांडे**
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०.

**थोडा मिळू दे गारवा, तिला माहेरी बोलवा, सोसायचाच ना आहे, पुन्हा वैशाखवणवा!**

# सुवर्णरेखाची रोजनिशी



– डॉ. लीला दीक्षित

**खरं** तर तिचं नाव सुवर्णरेखा. सोनूबाई हे जुनाट, तर सोनी हे छोटेसेच. म्हणून तिच्या आईनं हौसेनं सुवर्णरेखा नाव ठेवलं. सगळे मात्र ‘रेखा’च म्हणत.

रेखा शाळेतून आली. आई नुकतीच घरी आली होती. आल्या आल्या रेखाने मागणी केली, ‘‘आई मला एक वही हवीय.’’

‘‘अगंऽ, परवाच ना तुला चार वह्या आणून दिल्या?’’

‘‘त्या शाळेतल्या विषयांसाठी होत्या. ही वेगळीच गंमत आहे.’’

‘‘गंमत? कसली गंमत?’’

रेखा खुसूखुसू हसू लागली, ‘‘आई, गंमत काय लगेच सांगायची होय.’’

त्याचे असे झाले होते. रेखाच्या शाळेत नुकतेच गॅदरिंग झाले होते. त्यासाठी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणात सांगितले की,

‘‘माणसाने आपली रोजनिशी लिहावी. मोठी माणसे रोजनिशी लिहित असत. मागची पाने वाचून आपले काय चुकले हे आपले आपल्यालाच कळते. आपणच आपली चूक शोधली तर आपल्यात चटकन् प्रगती होते.’’

रेखाला पाहुण्यांचे म्हणणे पटले होते. कारण तिची आई तिच्या सारख्याच चुका काढायची, ‘तुला कळतच नाही, तू वेंधळी आहेस. तुला काय बोलावे ते कळत नाही.’’ एक ना दोन. आई सारखीच रागवायची म्हणून रेखाने ठरवले. आपण करून पाहूया तर प्रयोग!

रेखाच्या आईने दुसऱ्या दिवशी येताना एक छान वही रेखाला आणून दिली. रेखाची आई प्राथमिक शाळेत शिक्षिका होती. रेखाला बाबा नव्हते. तिचा भाऊ संजय सात वर्षांचा होता. तिघेच राहात होती. रेखा रोजनिशी लिहू लागली.

***ता. १ जाने. १९९८***

*नवीन वर्ष सुरू झाले. काल खरं म्हणजे अनुपमाच्या घरी ३१ डिसेंबरची पार्टी होती. अनुपमा किती श्रीमंत आहे. केवढा मोठ्ठा बंगला! पण आईने काही मला पार्टीला पाठवले नाही. नाना चौकशा केल्या. अनुपमाचे आई-बाबा पार्टीला जाणार म्हटल्यावर ती म्हणाली, ‘‘मुळीच जायचे नाही. तू आता बारा तेरा वर्षांची झाली आहेस. रात्री रस्त्याला गर्दी असली तरी या वयाच्या ५/६ मुलींनी बारा-एक वाजता घरी यायचे म्हणजे बरोबरच नाही.’’ अस्सा आईचा राग आला.*

***ता. ५ जाने. १९९८***

*गेले पाच दिवस मी रमाला विचारत्येय पार्टी कशी झाली? तर बोलायला तयारच नाही. सारखी आपली हिरमुसलेली. शेवटी काल खोदून खोदून विचारले तेव्हा म्हणाली, ‘‘कसली पार्टी? मला नाही आवडली. खायला प्यायला भरपूर होते. पण रात्री अनुपमाचा भाऊ आणि त्याचे मित्र आले आणि अस्सा धांगडधिंगा घातला. तिथल्या वातावरणात माझा जीव नुसता घुसमटला.’’ रमा रडू लागली! बरे झाले मी पार्टीला गेले नाही ते! आई म्हणते ते बरोबरच आहे. आपण आता लहान राहिलो नाही. आपल्याला चांगलं, वाईट कळायला हवं.*

***ता. ९ जाने. १९९८***

*उद्या शनिवार आहे. परीक्षा संपल्यावर आम्ही साऱ्या मैत्रिणी सिनेमाला जाणार आहोत. आईने परवानगी दिली आहे. आई कित्ती चांगली आहे!*

***ता. १० जाने. १९९८***

*कालचा सिनेमा! मस्त होता. ‘विरासत’ मला फार आवडला, इतकी मज्जा केली. अनुपमाचा बंगला शाळेजवळच आहे. तिच्या घरी गेलो. तिच्या महाराजांनी आम्हाला छान खायला केलं होतं. अनुची आई घरी नव्हतीच. माझी आई मी रोज शाळेतून घरी गेल्यावर घरीच असते. एखाद्या*

**सखी सजवेल सण, सुख वेचेल दुःखात, चांदण्याने रंगतील, तिचे कमळाचे हात।**

*दिवशी आई घरी नसली तर मला राग येतो. अनुला कसा येत नाही राग आईचा?*

*पण घरी आल्या आल्या आईने साऱ्या आनंदाचा विचका केला. अनुपमाच्या घरातून निघताना आम्ही साऱ्या मैत्रिणींनी अनुची लिपस्टिक ओठांना लावली होती. मी आरशात पाहिले. माझा रंग छान गोरा आहे. लिपस्टिकने माझे ओठ लाल झाले होते. किती छान दिसत होते मी! पण आईला काही मी छान दिसले नाही. घरी आल्या आल्या ती ओरडली–*

*''रेखा, हे काय? आणि असलं हे नटणं मला मुळीच पसंत नाही. लिपस्टिक लावायची नाहीच आणि दुसऱ्याची तर मुळीच नाही. आरोग्याला ते बरे नव्हे!'' आईचे दोन विषय विशेष आवडीचे. माझे आणि संजयचे आरोग्य आणि आमचा अभ्यास. आईचा अस्सा राग येतो ना?*

***ता. १२ जाने. १९९८***

*आज शाळेत आम्हा मुलींची आरोग्य तपासणी झाली. सर्वात उत्तम तब्येत असलेल्या मुलींना प्रत्येक वर्गात कप बक्षीस मिळतो. मला हे बक्षीस मिळाले. मला खूप आनंद झाला. घरी आईला कप दाखवला. आईने मला जवळ घेतले. अन् म्हणाली– ''काय म्हणाल्या डॉक्टरीण बाई? त्यांनीच बक्षिसे दिली का?''*

*''हो आई. डॉक्टरीण बाई म्हणाल्या रेखाचे आरोग्य सर्वात उत्तम आहे. सर्व मुलींनी तिचा आदर्श ठेवायला हवा. खूप मुलींनी नखे रंगवली होती. ''हे पाहा मुलींनो, उत्तम आहार, छान व्यायाम ठेवला की नखे, ओठ रंगवावे लागतच नाहीत. ते आपोआपच लालसर दिसतात आणि तेच खरे सौंदर्य!''*

*माझी नखे आणि गाल खरेच लालसर आहेत. परवा आई अनुची लिपस्टिक लावल्यावर का रागावली ते मला समजले. ''कुठलीही कृत्रिमता वाईटच.'' आई म्हणते ते बरोबरच आहे. आईमुळेच मला हे बक्षीस मिळालं. खरंच, अशी आई मिळायला भाग्यच हवं! किती त्रास देते मी तिला. चांगलं वागायचंच.*

***ता. १४ जाने. १९९८***

*आईने आंघोळ केल्यावर माझ्या हातात तीळाच्या वड्यांचा डबा दिला. म्हणाली, ''रेखा तुझ्या साऱ्या बाईंकडे जा. त्यांना तिळगूळ दे आणि नमस्कार करून त्यांचे आशीर्वाद घे.'' मी आदल्या दिवशी रमाला आणि अनुला विचारले होते. अनु तर म्हणाली– ''सारखा मोठ्यांना मान कशाला द्यायला हवा? आणि बाई एवढ्या कोण मोठ्या लागून गेल्या. त्यांना पगार मिळतोच ना शाळेत शिकवण्याचा?''*

*आईला हे सांगितले तेव्हा आई इतकी ओरडली म्हणाली– ''रेखाऽ त्या अनुला एकदा घरी येऊन ये. मी सांगते तिला.'' पण मी अनुला कधी घरी आणीतच नाही. आमचे दोन खोल्यांचे कुडमुडं घर! तिला काय वाटेल?*

*मला हल्ली कळतच नाही. आईचं खरं की अनुचं? मनाचा फार गोंधळ होतो.*

*शेवटी तिळगुळाचा डबा घेऊन साऱ्या बाईंकडे जाऊन आले. मनाला खूप प्रसन्न वाटले!*

***ता. १८ जाने. १९९८***

*गेले दोन तीस दिवस मला ताप आला होता. आज बरे आहे. गुळाच्या पोळ्या खूप खाल्ल्या, असे आईचे म्हणणे. ''खाण्यात विवेक हवा. भाजी आमटी कोशिंबीर सारं खायचे सोडून तू गूळपोळ्याच खात बसलीस त्याचा हा*



**सुख दाटूनिया आले, दुःखाएवढे गं झाले, जन्म बाईचा म्हणून, माझ्या ओटीमध्ये आले.**

*परिणाम!'' हे मात्र खरं! आईचं ऐकलं नाही, त्याने मी आजारी पडले हे सत्यच आहे. अजून दोन दिवस मी शाळेत जाणार नाही. अशक्तपणा आला आहे.*

*आज सायंकाळी सानेबाई, लिमयेबाई आणि घोरपडेबाई मला पाहायला आल्या. येताना माझ्यासाठी त्यांनी छान गजरा आणला होता. बाई किती चांगल्या आहेत. माझ्यावर खूप प्रेम करतात. अनु वेडीच आहे! म्हणे तिळगूळ देऊनबाईंचा आशीर्वाद कशाला घ्यायला हवा? हवाच घ्यायला. आपल्यावर प्रेम करणाऱ्या माणसांचा आशीर्वाद घ्यायलाच हवा. त्यात लाज कसली!*

***ता. २१ जाने. १९९८***

*१३ जानेवारी ते आजपर्यंत म्हणजे एक आठवडा मी शाळेत आले नव्हते. आज आल्यावर किती बरे वाटले. शाळा मला खूपच आवडते. सानेबाई, लिमयेबाई आणि घोरपडेबाई माझ्या घरी आल्या होत्या हे कळल्यावर, साऱ्या मुली उडाल्याच. तू काय बाईंची लाडकी! पण मी त्यांना सांगितले की बाई म्हणाल्या, ''कधीच आजारी न पडणारी रेखा आजारी पडली म्हणजे काय? ज्या मुली सदानकदा आजारी पडतात मग त्यांच्याकडे कोण बुवा जाणार?'' तेव्हा साऱ्या गप्प बसल्या.*

*आज वर्गात नोटीस आली होती. सातव्या इयत्तेतील सुमित्रा जाधवच्या हृदयावरच शस्त्रक्रिया करायची आहे. सर्वांनी आर्थिक मदत द्यावी म्हणून. सुमित्राला मी पाहिलेलेही नाही. पण खूप वाईट वाटले. आज सायंकाळी आईला सांगायला हवे!*

***ता. २२ जाने. १९९८***

*काल 'सुमित्रा जाधव' संबंधी आईला सांगितले. आईने ताबडतोब शंभर रुपये मला दिले. मला आश्चर्याचा धक्काच बसला. आई पैशाची फार काटकसर करते. परवा रमाचा वाढदिवस झाला तर मला फक्त १५ रुपयाचे एक पुस्तक आणून दिले. तेव्हा आईचा राग आला होता. पण आज शंभर रुपये कसे दिले बुवा! आईला उद्या विचारायलाच हवे.*

***ता. २३ जाने. १९९८***

*आज आमच्या वर्गात साऱ्यांनी पैसे जमा केले. आमच्या वर्गाचे ५१५ रु. जमले. कुणी वीस कुणी पंचवीस रुपये दिले. एवढी मोठ्ठी श्रीमंत अनुपमा तिने, 'बाई विसरले' म्हणून चक्क सांगितले. मीच सर्वात जास्त पैसे दिले असावे. बाई म्हणाल्या नाहीत, पण मला वाटते. आईने बजावले होते. आपण किती पैसे देतो ते मैत्रिणींना सांगत मिरवायचे नाही.*

*रात्री आईला विचारले. शंभर रुपयांबद्दल. तेव्हा ती हसली. म्हणाली– ''हे पाहा रेखा! तुझ्या मैत्रिणीला, रमाला खूप किंमतीचं प्रेझेंट दिलं नाही पण खूप मोलाचं प्रेझेंट दिलं आपण. या वयात चांगलं वाचन महत्त्वाचं असतं. वाचनाने विचार करण्याची शक्ती येते आणि मैत्रिणीला दिलेल्या बक्षिसाचे मोल पैशात करायचं नसतं. सुमित्रासाठी शंभर रुपये दिले ते खरे म्हणजे कमीच आहेत.*

*मी म्हटलं, ''कमी?''*

*आई म्हणाली, ''आज सुमित्राच्या जन्ममरणाचा प्रश्न आहे म्हणून प्रत्येकाने जास्तीत जास्त मदत करायला हवी.''*

*''अगं, पण सुमित्राला आपण ओळखतही नाही आणि रमा तर माझी सख्खी मैत्रीण आहे.''*

*''ओळखायला कशाला हवं? प्रत्येक माणसाचे प्रत्येक माणसाशी न ओळखताही, एक घट्ट नातं असतं. याचंच नाव माणुसकी. ते जपण्यातच माणसाचे मोठेपण आहे आणि असे माणुसकीने दिलेले देणे हीच खरी आपली संपत्ती.''*

*आई किती छान बोलली. त्याचाच विचार करीत मी झोपते आहे. आपली आई रिअली ग्रेट!*

***ता. २४ जाने. १९९८***

*आज शाळेत नोटीस आली होती. शाळेजवळ एक छोटीशी बाग आहे मुलांना खेळण्यासाठी; पण ती इतकी घाण झालेय, की बोलून सोय नाही. गवत वाढलंय, कचरा साठलाय. त्यामुळे छोटी मुले तेथे खेळतच नाहीत. २६ जानेवारीला झेंडावंदन झाले की दोन तास आमच्या वर्गाने श्रमदान करून ती स्वच्छ करायचीय. ही सानेबाईंची कल्पना.*

*अनुला सांगितले तर तिने नाक मुरडले. ''म्हणे श्रमदान! आम्ही घरीसुद्धा श्रम करीत नाही. आमच्याकडे श्रम नाहीत तर दान कसे करणार?'' ती फिदीफिदी हसली. मला आणि रमाला रागच आला. घरी आल्यावर आईला सांगितले तेव्हा आई म्हणाली,*

''रेखा तू त्या अनुकडे लक्ष देऊ नको. अगं श्रम ही संपत्ती आहे राष्ट्राची. ती सांभाळायची शिकवण अशा छोट्या गोष्टीतूनच मिळते. गरीब-श्रीमंत, लहान-मोठा साऱ्यांजवळ श्रम करण्याची संपत्ती असतेच. तुम्ही जरूर जा. श्रमदानाला!''

**ता. २६ जाने. १९९८**

आज शाळेत झेंडा-वंदन झाले. पाहुणे आले होते. किती छान बोलले ते. मला चांगला विचार ऐकायला खूप आवडू लागलंय. आज आम्हाला शाळेत पेढे वाटले.

अनु शाळेत आलीच नाही. आम्ही साऱ्यांनी श्रमदान केले. बागेत साफसफाई केली. गवत उपटून टाकले. शाळेच्या रामचंद्र सुताराने घसरगुंडी आणि झोपाळे पण दुरूस्त केले. आम्ही नवीन झाडे लावली. सानेबाईंनी आठ-आठ मुलींचे गट केलेत. शाळा सुटल्यावर रोज गटा-गटाने झाडांना आम्ही पाणी घालणार आहोत.

**ता. ३० जाने. १९९८**

आज घरी येताना गंमत वाटली. आम्ही स्वच्छ केलेल्या बागेत पाच, सहा मुले खेळत होती. किती गोड दिसत होती ती. आता झाडे वाढली की बाग छानच दिसेल!

**ता. १ फेब्रु. १९९८**

१५ फेब्रुवारीला आईचा वाढदिवस आहे. मी माझ्या खाऊच्या पैशातून आईसाठी छान पिशवी भरणार आहे. सानेबाई मला खूप आवडतात. त्या म्हणाल्या- ''मी तुला कापड आणून देते. रेशीमही देते. मी शिकवीन तुला भरतकाम.'' आईच्या नकळत हे करायला हवं. त्यातच गंमत आहे. रोज शाळा सुटल्यावर मी अर्धातास बाईंकडे थांबणार आहे. आईला सांगितले, ''मी अर्धातास उशीरा येईन, सानेबाईंकडे जाणार आहे?''

''कशासाठी?'' आईने विचारले.

''आहे आमची गंमत!'' मी म्हणाले.

सानेबाईंकडे जाणारेय म्हटल्यावर आईने लगेच परवानगी दिली. आईचा सानेबाईंवर किती विश्वास आहे.

**ता. ५. फेब्रु. १९९८**

हल्ली मला वेडच लागलंय. शाळा सुटल्यावर सानेबाईंकडे जाऊन भरतकाम करण्याचे. बाई म्हणाल्या, ''रेखा घरी जाऊन कर ना; तुला आता सारे टाके आणि रंगसंगती कळलीच आहे.'' पण मी बाईंना साफ सांगितलं. ''बाई मी पंधरा वीस मिनिटे जास्त थांबेन, पण माझी गंमत आईला आधी कळायला नको.''

**ता. ८ फेब्रु. १९९८**

आईला गाण्याची खूप आवड आहे. कालच आमची आजी कोकणातून आली आहे. त्यामुळे संजयला रात्री कोठे ठेवायचे हा प्रश्न नाही. मी आणि आई रात्री भीमसेन जोशी यांच्या अभंगवाणी कार्यक्रमाला जाणार आहोत. खरं म्हणजे मला आऽ अऽऽ चे गाणे फारसे आवडत नाही परंतु आई म्हणते मला जे कळत नाही, अभिजात म्हणून जे जे आहे ते या वयात घ्यायला शिकले पाहिजे, ऐकले पाहिजे. म्हणून आईचा आग्रह असतो. ती मला कालच बालगंधर्वला, चित्र प्रदर्शनाला, घेऊन गेली होती. मला प्रदर्शन खूप आवडले.

**ता. ९ फेब्रु. १९९८**

कालचे भीमसेन जोशींचे गाणे ऐकून मी थक्क झाले. माणसाच्या आवाजात इतकी ओजस्विता कशी येते बुवा! वीज लहरावी तसे त्यांचे गाणे होते. बरे झाले आईबरोबर गाणे ऐकायला गेले ते!

आज शाळेत तिळगूळ समारंभ होता. खरं म्हणजे रथसप्तमीलाच तो होता पण काही कारणाने तो लांबला होता. शाळेत गेल्यावर मी, अनुने आणलेला घागरा घातला. तो काही आरोग्याला बाधक नाही. कसे कोण जाणे आईला कळले. तिने माझी चांगलीच हजेरी घेतली. म्हणाली, ''हव्यासापायी दुसऱ्याचे श्रीमंती कपडे, दागिने मला वापरलेले मुळीच आवडत नाहीत. साधे राहावे. आपलं असेल तेच खरं. स्वाभिमानाने राहावं.'' आईच्या उपदेशाचा मला कंटाळा आलाय. ''एक दिवस मैत्रिणीचे कपडे वापरले तर काय झालं?''

**ता. १० फेब्रु. १९९८**

आज शाळेत गेल्या गेल्या अनु ओरडली, ''काय गं रेखेऽ काल माझा घागरा घालून मिरवलीस. डाग पाडलेस ना त्याला?''

''मी कुठे पाडले?''

''मग काय मी पाडले?''

मला तर रडूच आले! साऱ्या मुलींच्या देखत माझा अपमान केला

अनुनं. अगदी वाईट आहे. नंतर रमा म्हणाली, 'अगं तू घागरा घातलास तेव्हाच होते डाग त्याच्यावर. पण गडद रंगात तुझ्या लक्षात आले नसणार. मी पाहिले होते, धन्य हो अनुची! किती खोटेपणा हा.' आई म्हणते तेच बरोबर. आपला स्वाभिमान आपणच जपायला हवा. यापुढे प्रतिज्ञा! मैत्रिणींचे कपडे घालून मिरवायचे नाही. साधी राहणी हा देखील एक दागिना!

**ता. १३ फेब्रु. १९९८**

आज सकाळीच आई शाळेबरोबर ट्रीपला गेली. रात्री आल्यावर माझ्यावर चांगलीच ओरडली. का तर म्हणे मी आजीला काहीच मदत केली नाही. आजीनेही सांगितले नाही आणि मीही विचारले नाही. आजीला तरी काय हरकत होती मला सांगायला. आई मला रागवायचं निमित्तच पाहात असावी. म्हणाली–

'रेखा, घरात आजी वयस्कर, तुला कळायला नको, आपणहून चार कामाची मदत करायला? मी सांगितलं नाही. म्हटलं एवढी अक्कल असेल तुला. अगं– न सांगता काम करील तीच खरी! कामावे ते सामावे!'

बाकी चुकलंच माझं. आजी किती दमली होती. रात्री, म्हणूनच मी तिचे पाय चेपून दिले.

**ता. १४ फेब्रु. १९९८**

उद्या आईचा वाढदिवस. माझी भरतकामाची पिशवी आज पूर्ण झाली. सानेबाईंनी पिशवी शिवायलाही शिकवलं. आई रागावली की तिचा मला राग येतो खरा, पण मला ती फार



आवडते. उद्या सकाळी तिच्या उशाशी गुलाबाचे फूल आणि ही पिशवी मी ठेवणार आहे. माझी शिकवायला जाईल आई खूप आनंद होईल मला.

**ता. १५ फेब्रु. १९९८**

सकाळी आई उठली आणि माझी पिशवी आणि फूल पाहून इतकी खूष झाली की तिच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. मला तिने जवळ घेतले. किती बरे वाटते अशा वेळेला. ती म्हणाली,

''रेखा, तुझी पिशवी सुंदरच आहे. स्वतःच्या कष्टाने छोटी वस्तू जरी दुसऱ्याला दिली तरी तिचे मोल खूप असते. तू फार गुणाची होत चाललीस हल्ली.''

मी आईला बिलगले. म्हटलं, ''आई तुला आठवते मी हल्ली रोजनिशी लिहिते? त्यातील मागील पाने वाचून माझे मलाच समजते. मी काय चुका करते ते!

रेखाच्या आईने रेखाला जवळ घेतले. तिच्या हातात एक सोनेरी अक्षर असलेली छान डायरी दिली. म्हणाली, ''रेखा, मी तुझी रोजनिशी मुद्दाम वाचली. छान आहे उपक्रम. ह्या डायरीत प्रत्येक दिवसाला स्वतंत्र पान आहे. कायम रोजनिशी लिही. रेखाने उठून आईला नमस्कार केला. तिचा वाढदिवस होता ना! नमस्कार करता करता ती मनात म्हणाली, ''आता रमाला पण सांगायचे रोजनिशी लिहायला.'' ●●

**डॉ. लीला दीक्षित**
'ध्रुव' ४९/२ सहजानंद सोसा.,
कोथरूड, पुणे २९.

**प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ ॲक्ट अधिनियम ११ बी अन्वये**
**प्रसिद्ध करावयाची माहिती– अर्ज क्र. ४ (नियम ८ प्रमाणे)**

**वृत्तपत्राचे नाव :** छात्र प्रबोधन **प्रसिद्धी काळ :** मासिक
**संपादक, प्रकाशक व मुद्रकाचे**
**नाव व पत्ता :** प्रा. मंहेन्द्र सेठिया, ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०.
**राष्ट्रीयत्व :** भारतीय
**मासिकाची मालकी :** ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३०.
मी महेन्द्र सेठिया असे जाहीर करतो की, वरील माहिती माझ्या माहितीप्रमाणे खरी आहे. पुणे,
सौर १० फाल्गुन शके १९१९
(१ मार्च १९९८) महेन्द्र सेठिया, (संपादक, छात्र प्रबोधन)

**तूच लक्ष्मी माता म्हणूनी अनेक नाती तुजला, जीवनी धैर्यशील तू स्फूर्तिदायिनी, तू दयार्द्र, विवेकी, स्वाभिमानी.**

# कविता पाठोपाठी





## मी

ही क्षितिजांची नवीन आभा
खुणावते मज आहे
स्वप्न नव्याने पंखांमध्ये
बळ उडण्याचे भरते आहे.
    पानगळीतून शतकांच्या 'त्या'
    मी सावरते आहे
    आज पुन्हा नव्याने
    मी पालवते आहे.
ना सृजनाचे फक्त सूक्त मी
ग्रंथ शक्तिचा आहे
समर्थ आहे सबला अनघा
मी अग्नीतेज आहे.
    या वरुणाचा वेग बुद्धीला
    मी बीज धरित्री आहे.
    प्रपात आहे जलौघाचा
    मी अंतरिक्ष आहे.
अतित गर्भातील उषा मी
आज उमलते आहे
अंध:कारावर उठणारा
मी सूर्योदय आहे.

**बंगाली कविता –अनिता चक्रवर्ती**
**अनुवाद – सरला दिघे**
१३७, प्रेरणा प्रतिष्ठान, रामनगर, चिंचवड १९.

## आई


देवादिकांच्या फोटोत असावं तसं
तुझ्या भोवतीचं देवस्वरूप तेजोवलय
दूर झाल्यानंतर तू दिसलीस
तेव्हा खरी थक्क झाले.

तू आई होतीस म्हणून कितीएक गोष्टीत
तुला गृहीत धरले आम्ही
तुझे राबणे, तुझे सोसणे,
तुझे स्वत:ला मिटवून टाकणे
अगदी साहाजिकच समजलो आम्ही.

आज पाळणाघर, ट्यूशन्स आणि व्यक्तिमत्त्व विकास
शिबिरांच्या जोरावर
आमचं आईपण मिरवतो आम्ही
व्हीसीआर, केबलद्वारे पिढी घडवतो आम्ही
बाजारातून श्लोकांच्या कॅसेट आणतो आम्ही
पैसे टाकून संस्कारही विकत घेतो आम्ही.

तेव्हा थिटेपण नकळत जाणवून जाते
मोठेपण तुझे डोळे पाणवून टाकते
पण आई,
तू माणूससुद्धा होतीस
माणूस असून दिव्यत्वाच्या ओझ्याखाली जगलीस
एक चरित्र घडवताना उभी पुण्याई पणाला लावलीस
खरंच विसरलेच होते आजवर
तू माणूससुद्धा होतीस
तू माणूससुद्धा होतीस!

**अंजली कुलकर्णी**
बी/२०, झाला कॉम्प्लेक्स, मार्केट यार्ड, पुणे ३७.



**आई, तुझ्या सान्निध्यात दीप आशेचा लागतो, तुझ्या सदुपदेशांचे तेल मिळता तेवतो.**

## अभ्यासातील स्वावलंबन
# लेखन कौशल्य-भाग ३
प्रा. विवेक पोंक्षे

मुलांनो, मागील लेखात आपण लेखनाचे प्रकार आणि लेखनाचे अंतरंग याची माहिती घेतली. आता आपण विविध प्रकारच्या प्रश्नांचा नेमका अर्थ काय व त्यांची उत्तरे लिहिताना काय अपेक्षित असते ते बघूया:

स्वत:च्या पदरचे शब्द त्यात घालू नयेत अन्यथा अर्थछटेत बदल होण्याची शक्यता असते. व्याख्या लिहिल्यानंतर एखादे उदाहरण अगदी थोडक्यात लिहिण्यास हरकत नाही.


**उदा. व्याख्या लिहा. पुळण**

**पुळण- समुद्राच्या लाटांबरोबर वाहत येणारी बारीक वाळू, रेती इ. पदार्थ समुद्र किनाऱ्याला समांतर दिशेत निक्षेपित होतात. वाळूच्या या निक्षेपणास पुळण म्हणतात. उदा. कोकणातील अलिबाग येथील किनारा.**

**२. नियम सांगा (तत्त्व सांगा) (State the law, rule or principle)** – व्याख्या द्या प्रमाणेच नियम लिहिताना अचूक व जसेच्या तसे शब्द लिहावेत. स्वत:च्या पदरचे शब्द घालू नयेत. एखादे उदा., सूत्र, आकृती, या आधारे अगदी थोडक्यात अर्थ उलगडून सांगावा.

**उदा.-१) संवेग अक्षय्यतेचा नियम-कोणत्याही बाह्यबलाची क्रिया होत नसताना, जेव्हा दोन किंवा अधिक वस्तूंमध्ये टक्कर होते, तेव्हा त्या वस्तूंचा आघातापूर्वीचा एकूण संवेग हा त्यांच्या आघातानंतच्या एकूण संवेगाइतकाच असतो.**


$$m_1\vec{u_1} + m_2\vec{u_2} = m_1\vec{v_1} + m_2\vec{v_2}$$



**३. कारण सांगा (State reason of)**

या प्रकारच्या प्रश्नात दिलेली घटना व ती घटना ज्या तत्त्वावर आधारित आहे या दोघांमधील कार्यकारण संबंध स्पष्ट करायचा असतो. प्रश्नातील घटना ही परिणाम असते. उत्तर लिहिताना किमान तीन मुद्दे अपेक्षित असतात. १. तत्त्व अथवा नियम, २. कार्यकारण संबंध, ३. स्पष्टीकरण.



**उदा. – स्पायरोगायराचे तंतू बुळबुळीत असतात- कारण सांगा १) स्पायरोगायराच्या पेशीची भित्तीका त्रिस्तरीय असते. त्यातील आतील दोन स्तर सेल्युलोजचे तर बाहेरचा स्तर पेक्टिनचा असतो. २) पेक्टिन पाण्यात विरघळते व तंतूभोवती जिलेटिनी आवरण तयार होते. ३) हे आवरण हातास बुळबुळीत लागते. म्हणून स्पायरोगायराचे तंतू बुळबुळीत असतात.**




**४. फरक लिहा (Differentiate, Give differences)**

दोन वस्तू, घटना, प्रक्रिया इ. मधील फरकाचे मुद्दे लिहिणे अपेक्षित असते. हे फरक कोणत्या निकषांवर केले आहेत, ते निकषही लिहावेत. फरकाचे स्पष्टीकरण देणे आवश्यक असेल तर फरक का आहे. फरकामुळे काय परिणाम झाला तेही लिहिणे अपेक्षित आहे. फरकाची उदाहरणे व फरक स्पष्ट करणारी आकृती काढली तर अधिक चांगले.

**उदा.** – निकटदृष्टिता व दूरदृष्टिता

| क्र. | मुद्दा | निकटदृष्टिता | दूरदृष्टिता |
|---|---|---|---|
| १. | वस्तूचे अंतर | हा दोष असणाऱ्या व्यक्तीस दूरच्या वस्तू स्पष्ट दिसत नाहीत | हा दोष असणाऱ्या व्यक्तीस जवळच्या वस्तू स्पष्ट दिसत नाहीत. |
| २. | नेत्रगोलाचा आकार | वाजवीपेक्षा लांबट असतो. | वाजवीपेक्षा आखूड असतो. |
| ३. | नेत्रभिंगाची वक्रता | जास्त वक्रता आलेली असते. | कमी वक्रता आलेली असते. |
| ४. | प्रतिमेचे स्थान | दूरच्या वस्तूंची प्रतिमा दृष्टिपटलाच्या अलीकडे तयार होते. | जवळच्या वस्तूची प्रतिमा दृष्टिपटलाच्या मागे पडते. |
| ५. | उपाय | अंतर्वक्र भिंगाच्या चष्म्यामुळे प्रतिमा मागे सरकून दृष्टिपटलावर पडते | बहिर्वक्र भिंगाच्या चष्म्याने प्रतिमा पुढे सरकून दृष्टिपथावर पडते. |
| ६. | आकृती | AB = दृष्टिपटल I = प्रतिमा   |   |

५. टीप लिहा. (Write Note on)

यामध्ये दिलेल्या विषयासंबंधीची जास्तीत जास्त माहिती लिहिणे अपेक्षित असते. विषयाच्या सर्व बाजू, महत्त्वाचे सर्व मुद्दे, त्या मुद्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित असते. मुद्यांची संख्या, त्यांची मांडणी, प्रतिपादनाची शैली, स्पष्टीकरणासाठी दिलेली उदाहरणे, काढलेल्या आकृत्या यांना महत्त्व असते. टीपा लिहिताना रूपरेषा दाखवणारा तक्ता अथवा आकृती काढली तर शब्दसंख्येची मर्यादा न येता तुम्ही सविस्तर उत्तर लिहू शकता.

**उदा. - प्र. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनाची खालील मुद्यांच्या आधारे माहिती द्या. अ) ८ ऑगस्ट १९४२ चा ठराव. ब) गांधीजींचा संदेश, क) भूमिगत नेत्यांचे कार्य, ड) जनतेचा सहभाग. उत्तर-१) भारत छोडो लढ्याची दुसऱ्या महायुद्धातील पीछेहाट, अमेरिका व इतर राष्ट्रांचे वाढते दडपण, भारतीय जनतेचा स्वातंत्र्यचळवळीला वाढता पाठिंबा यामुळे ब्रिटिशांवरील भारतीय स्वातंत्र्याबद्दल वाढते दडपण, परिणाम क्रिप्स योजना. परंतु त्यात स्वातंत्र्याबद्दल ठोस भूमिका नसल्याने काँग्रेसने ती फेटाळली. जनतेने अंतिम लढ्यासाठी सज्ज व्हावे म. गांधींचा संदेश.**

**२) ८ ऑगस्टचा ठराव अ) मसुदा- ब्रिटिश राजवट संपवणे हा तातडीचा व निकडीचा प्रश्न आहे. त्यावर युद्धाचे, स्वातंत्र्याचे व लोकशाहीचे भवितव्य अवलंबून आहे. स्वतंत्र भारत नाझी आक्रमणाविरूद्ध लढेल व संयुक्त राष्ट्रांना सहकार्य करेल. ब) वैशिष्ट्ये- १. निश्चयात्मक भूमिका, २. जागतिक परिस्थितीशी भारतीय स्वातंत्र्याची सांगड, ३. लोकशाहीच्या बाजूने व साम्राज्यशाही विरोधी स्पष्ट भूमिका. ३) गांधीजींचा संदेश- ठरावावरील भाषणांत गांधीजींनी ब्रिटिशांना चले जाव असा निर्वाणीचा इशारा दिला; तर जनतेला सर्व शक्तीने लढण्याचे आवाहन करून 'करेंगे या मरेंगे' असा संदेश दिला. ४) भूमिगत नेत्यांचे कार्य- १. गांधीजी, पं. नेहरू, सरदार पटेल, इ. प्रमुख नेत्यांना अटक. २. नेतृत्वाची दुसरी फळी उभी. हे नेते भूमिगत. जयप्रकाश नारायण, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफअली, डॉ. लोहिया, साने गुरुजी, नाना पाटील इ. ३. त्यांनी जनतेचा उत्साह व स्वातंत्र्येच्छा टिकवून धरली. ४. काँग्रेसचा बारा कलमी कार्यक्रम जनतेपर्यंत पोहोचवला. ५. रेडिओ स्टेशन्स चालवून ब्रिटिशांचा अपप्रचार थोपवला. ६. भूमिगत सरकारे चालवून प्रशासन व्यवस्था खिळखिळी केली. ५) जनतेचा सहभा १. उत्स्फूर्त सहभाग, २. रेल्वे उखडणे, तारा जोडणे यासारखे निषेधात्मक कार्यक्रम, ३. भूमिगत नेते व भूमिगत सरकारला पाठिंबा, ४. १० हजार लोक मृत्यु पडले. ६० हजार अटकेत. ५. जनतेतूनच नवे स्थानिक नेतृत्व उदयाला येऊन आंदोलन खऱ्या अर्थाने जनआंदोलन ठरले.**

**६. टिप्पणी करा. (Comment)**

यामध्येही स्पष्टीकरणासहीत टिप्पणी लिहिणे आवश्यक असते. पण त्यापुढे जाऊन चिकित्सा करणे अपेक्षित असते. या चिकित्सेच्या आधारे, त्या विषयासंबंधीचे स्वत:चे मत शेवटी मांडले पाहिजे. या प्रश्नाच्या उत्तरात तुमच्या स्वत:च्या मताला इतरांच्या मनापेक्षा जास्त महत्त्व असते. त्यामुळे पुस्तकात काय दिले आहे, इतरांनी काय म्हटले आहे. इ. तपशील न देता फक्त Factual Information देऊन त्यावर मतप्रदर्शन करणे आवश्यक असते. विषय तुम्हाला किती आणि कसा समजला आहे हे या उत्तरातून वाचकाला कळले पाहिजे.

या प्रकारचे लेखन करताना स्वतंत्र विचार करण्याची सवय लागते. त्यामुळे असे लेखन सातत्याने करण्याचा उपयोग होतो.

**७. तुलना करा. (Compare)**

निरनिराळ्या संकल्पनांमध्ये, प्रक्रियांमध्ये कोणत्या प्रकारचा संबंध आहे हे स्पष्ट करणे हा या प्रकारच्या उत्तरातील पहिला टप्पा असतो. त्यासाठी त्या दोन संकल्पनांचे सर्व गुणधर्म मांडावेत. कोणत्या गुणधर्मांच्या बाबतीत त्या संकल्पनांमध्ये साम्य आहे? कोणत्या गुणधर्मांच्या बाबतीत त्या संकल्पना परस्परपूरक आहेत? कोणते गुणधर्म परस्परविरोधी आहेत? कोणत्या गुणधर्मांच्या बाबतीत त्यांच्यात फरक आहे? कोणत्या गुणधर्मांच्या बाबतीत त्या परस्परांवर अवलंबून आहेत? त्यांच्या महत्त्वांमधला फरक कोणता आहे? या प्रकारची सविस्तर चर्चा येथे करणे अपेक्षित असते. साम्य आणि भेद दाखविणारी जास्तीतजास्त उदाहरणे द्यावीत व आवश्यक त्या आकृत्या काढाव्यात.

बऱ्याच विद्यार्थ्यांचा असा गैरसमज असतो की तुलना करा म्हणजे फरक स्पष्ट करा. फरक सांगणे हा तुलना करताना लक्षात घ्यायचा एक मुद्दा आहे हे ध्यानात घ्या.

**८. वर्णन करा. (Describe)**

**आपले जीवन सुखाचे, असते जगाला दाखवायचे, साईखालचे दूध मनातच लपवायचे.**

येथे ज्याचे वर्णन करायचे त्याची सर्व गुणवैशिष्ट्ये लिहिणे अपेक्षित असते. वर्णन करताना बाह्य रचनेचे वर्णन (External morphology) करावे लागते तसे अंतरंगाचेही वर्णन करणे अपेक्षित असते. वर्णनात नेमकेपणा व अचूकता असावी लागते. कीर्तनकारासारखे पाल्हाळ लावणे येथे अपेक्षित नाही.

शक्य तेथे वर्ण्य विषयाची आकृती काढता आली तर चांगली. वर्णनात इतरांपेक्षा खूप वेगळी वैशिष्ट्ये मुद्दाम ठसठशीत लिहावीत.


**उदा. -** *Describe the changes in the cell during interphase.*

*- interphase is the name given to the time during which the cell is not in an active stage of cell division. However the cell itself is very active, performing all the life functions that are needed for survival. The following changes take place during interphase.*

*1. Each of the chromosomes duplicates itself*

*2. The identical chromosomes remain attached to each other at a point called centromere.*

*3. The cell itself grows, preparing new cytoplasmic material in preparation for cell division.*




**९. चर्चा करा. (Discuss)** ज्या विषयावर चर्चा करायची त्या विषयाच्या सर्व मुद्यांचा विचार करायचा. या मुद्यांपैकी विरुद्ध मुद्दे व बाजूचे (अनुकूल) मुद्दे कोणते? व ते तसे का आहेत याबद्दल स्पष्टीकरण करायचे. अशी साकल्याने मांडणी अपेक्षित असते. चर्चा करताना विषयाची एखादीच बाजू अभिनिवेशाने मांडू नये.

**उदा. -** *Discuss : How the increased use to fossil fuels could destroy our beaches.*

*- Coal, petrolium, Natural gas are the fossil fuels which are used widely. They contain mainly hydrocarbons. They are easily available and hence it's domestic and industrial use is more, which is obvious.*

*But these fuls upon burning give carbon dioxide which is released in the atmosphere. Increasing level of $CO_2$ leads to increase in atmospheric temperature.*

*This effect is known as Green House effect.*

*Due to increase in temperature there is every possibility of melting many glaciers and parts of ice caps at polar regions. This may cause the ocean levels to rise. Which in turn will lead to increased coastal erosion. Thus our beaches will get distroyed which is an indirect fallout of increased use of fossil fuels.*

**१०. स्पष्ट करा (Explain)**

यात सविस्तर माहिती अपेक्षित असते. एखाद्या घटनेची सर्व कारणे सांगणे अपेक्षित असते. काही संबंध, दोन मुद्यांमधील दुवे अस्पष्ट असतात, ते लिहिणे अपेक्षित असते. उदाहरणे देऊन मुद्दा वाचकाला समजावून द्यावा लागतो.

**११. समर्थन करा. (Justify)**

एखादे विधान बरोबर आहे किंवा चूक आहे हे दाखवून आपल्याला म्हणण्याला पुष्टी देणारे पुरावे देणे या उत्तरांत अपेक्षित असते. त्यासाठी सर्व तऱ्हेची आवश्यक ती कारणमीमांसा लिहावी लागते. सगळ्यात महत्त्वाची कारणे आधी व नंतर कमी महत्त्वाची कारणे असा क्रम प्रतिपादनात असावा.


**१२. सिद्ध करा. (Prove)**

या प्रकारचे प्रश्न मुख्यत: गणित-भूमिती अथवा विज्ञानात येतात. सिद्ध करण्यासाठी जो तर्क विचार आपण मांडतो त्याची विशिष्ट मांडणी अपेक्षित आहे. जे विधान सिद्ध करायचे ते विधान आधी लिहून घ्यावे. आवश्यक असेल तर आकृती काढावी. आकृतीत केलेल्या नव्या रचना दाखवाव्यात. आकृतीच्या बाजूस पक्ष (Given) व साध्य (To prove) लिहावे. त्याखाली आकृतीतील महत्त्वाच्या रचना लिहाव्यात. नंतर सारणीच्या स्वरूपात एकाखाली एक विधानांची साखळी लिहीत जावी. सारणीच्या डाव्या बाजूला ही विधाने येतील. तर उजव्या बाजूस त्या विधानांचे समर्थन कारणे असली पाहिजेत. विधानांना क्रमांक घालावेत.

**उदा. - विधान : त्रिकोणाच्या एका भुजेला समांतर असणाऱ्या रेषेने त्या त्रिकोणाच्या इतर दोन भुजांना दोन भिन्न बिंदूंत छेदल्यामुळे जो त्रिकोण मिळतो तो मूळ त्रिकोणाशी समरूप असतो.**

**झाडांवरची फुलं पहात पहात, काटेरी वाट तुडवावी लागते, रक्तबंबाळ हातांनी, चांदणे झेलावे लागते.**

आकृती :




पक्ष : Δ ABC मध्ये
रेख PQ|| रेख BC
A-P-B व A-Q-C
साध्य : Δ APQ~Δ ABC

सिद्धता :

| क्र. | विधाने | कारणे |
|---|---|---|
| | APQ↔ABC | |
| १. | ∠APQ ≅ ∠ABC | छेदिकेने समांतर रेषांना छेदले असता होणारा संगत कोन एकरूप |
| २. | ∠AQP ≅ ∠ACB | वरीलप्रमाणे |
| ३. | ∠PAQ ≅ ∠BAC | A-P-B व A-Q-C म्हणून सामायिक |
| ४. | Δ APQ~Δ ABC | A-A-A समरूपता कसोटी सिद्ध |

**१३. संदर्भासह स्पष्टीकरण :**

या प्रकारचा प्रश्न साधारणपणे भाषा विषयांत विचारला जातो. एखादे महत्त्वाचे विधान अथवा उद्‌गार देऊन त्याचे स्पष्टीकरण विचारलेले असते. उत्तर लिहिताना त्या विधानाचा संदर्भ लिहावा लागतो. यामध्ये ते विधान कोणी केले आहे, कोणाला उद्देशून केले आहे हे सांगावे लागते. काहीवेळा एखाद्या घटनेच्या, प्रसंगाच्या संदर्भात ते विधान केलेले असते. त्याचा थोडक्यात उल्लेख करावा लागतो. काहीवेळा एखाद्या तर्कसंगत विचाराचा निष्कर्ष अथवा परिणाम म्हणून ते विधान आलेले असते. अशावेळी थोडक्यात अशा विचारांची पार्श्वभूमी विषद करावी लागते. या विधानाच्या जर पुष्टीसाठी काही उदाहरणे द्यावी लागतात. विधानात जर काही श्लेष केलेला असेल अथवा काही गर्भितार्थ सूचित केला असेल, तर तो उलगडून दाखववावा लागतो.

**उदा. - पुरावा असे सांगती की, शिवाजीची भूमिका महाराष्ट्राच्या चौकटीत मावणारी नव्हती. संदर्भ- हे वाक्य महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत प्राचार्य नरहर कुरुंदकर यांच्या 'छत्रपती शिवाजीमहाराज जीवन रहस्य' या पुस्तकातून निवडलेल्या 'जनतेचे राज्य' या पाठातील आहे.**

**या पाठात छत्रपती शिवाजी महाराजांची थोरवी विषद करताना ते केवळ हिंदूंचे वा महाराष्ट्राचे राजे नव्हते. असे प्रतिपादन करण्यासाठी वरील विधान केले आहे.**

**स्पष्टीकरण -१) छत्रपतींनी काशीपासून रामेश्वरपर्यंत राज्यविस्ताराची इच्छा बाळगली. कर्नाटक, तंजावरपर्यंत त्यांचे राज्य प्रत्यक्षात महाराष्ट्राबाहेर पसरले होते. पण याचा अर्थ असा नव्हता की, जिंकलेल्या प्रदेशाला, ते जित प्रदेश अथवा महाराष्ट्राच्या वसाहती समजत होते. २) त्यांचे युद्ध केवळ महाराष्ट्राच्या मुक्ततेसाठी नव्हते तर अखिल भारत परकीयांच्या आक्रमणांपासून मुक्त करण्यासाठी होते. ३) साऱ्या भारत वर्षात एका शिवाजीचे राज्य व्हावे असे त्यांनी कधीच म्हटले नाही. ते या राज्याला 'एतद्देशीयांचे राज्य' अथवा 'हिंदवी स्वराज्य' म्हणूनच संबोधत असत. ४) हे राज्य निर्माण करणे हे परमेश्वरी इच्छा म्हणजे पर्यायाने जनकल्याणार्थ राज्य निर्माण करणे असे आहे, असे महाराज मानत असत. ५) शिवाजीवर मराठ्यांचा राजा असा संकुचित शिक्का मारणाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की, त्यांना अनेकदा स्वकीयांशी लढावे लागले. ही भूमिका अतिशय व्यापक आहे. असे कुरंदकर तर्कसंगतीने पटवून देतात व वरील वाक्यात त्यांचा हा दावा ते पुराव्यासह करीत आहेत असेही प्रतिपादतात. शिवाजी महाराजांना महाराष्ट्राच्या प्रादेशिकतेच्या संकुचित चौकटीत बांधणाऱ्यांना महाराजांच्या व्यापक राष्ट्रवादाची ओळख करून देताना अतिशय ठामपणे हे विधान केले आहे.**

**संकुचिततेला चौकट हा समर्पक शब्द वापरून त्यांनी हे वाक्य अधिक ठाशीव केले आहे.**

आपल्याकडे भरपूर माहिती असून पुरत नाही, ती अचूक, योग्य पद्धतीने कागदावर उतरविता येणे आवश्यक असते. विविध प्रश्नांची उत्तरे लिहिताना काय अपेक्षित असते ते वर दिलेच आहे. त्या आधारे प्रश्नोत्तरे व प्रश्नपत्रिका यांचा सराव करा आणि परीक्षेत उत्तम यश मिळवा.

●●

**प्रा. विवेक पोंक्षे**
रघुराज सोसायटी,
पुणे–सिंहगड रस्ता, पुणे ३०

**चेहरा माझा जीवन माझे, वेड्यावाकड्या रेषांचे, डोळयांमध्ये चित्र दिसते, सोसलेल्या ग्रीष्माचे.**

# ‘गप्पा उस्ताद शाहीद परवेझ यांच्याशी’

***अलिबाग येथील ‘मैफिल’ या संस्थेतर्फे, डिसेंबर महिन्यात ‘उस्ताद अजीज खाँ स्मृती संगीत समारोह’ आयोजित करण्यात आला होता. यावेळी, या समारोहाचे प्रमुख, ज्येष्ठ सतारवादक उस्ताद शाहीद परवेझ यांच्याशी गप्पा मारायची संधी, छात्र प्रबोधनच्या अलिबागच्या सभासदांना उपलब्ध झाली होती. आपल्या सतार वादनाने श्रोत्यांना मोहवून टाकणाऱ्या शाहीदभाईंनी तितक्याच मनमोकळेपणाने या बालमित्रांशी गप्पा मारल्या आणि एका वेगळ्या व्यक्तिमत्त्वाची मुलांना नव्याने ओळख झाली.***

❧ ''तुम्हाला कोणते वाद्य वाजवायला आवडते? असा प्रश्न जर आपण कुणाला विचारला की, तबला, पेटी, तंबोरा अशी उत्तरे येतात पण शाहीदभाई, तुम्ही वाजविण्यासाठी सतार हे वाद्य कसे निवडले?''

*''सतार हे वाद्य निवडण्यासाठी माझी घरची पार्श्वभूमी कारणीभूत ठरली. आमच्या गेल्या कित्येक पिढ्या सतार वाजवत आहेत. माझे वडील उस्ताद अजीज खाँ हेही उत्तम सतार वाजवत. त्यांनी मला अगदी लहान असतानाच खेळणं म्हणून मला सतार हाताळायला दिली. मग मला आपोआपच सतार वादनाची गोडी लागली. वयाच्या चौथ्या वर्षापासून मी वडिलांकडे सतार वादनाचे शिक्षण घ्यायला सुरुवात केली आणि मी त्यातच प्रावीण्य मिळविले.''*

❧ पण हे प्रावीण्य मिळवायला रियाजही खूप करावा लागला असेल ना?

*''नक्कीच. कारण कुठलीही गोष्ट काही तुम्हाला आपोआप येत नाही. त्यासाठी कष्ट हे घ्यावेच लागतात. संगीत हे ऐकूनच शिकायचे असते आणि आळवून मनात बसवायचे असते. तरच त्याची फळे गोड असतात. मीही लहानपणापासूनच दिवसातून ८ ते १४ तास सराव करतो. वडिलांनी मला सर्व रागांचे प्राथमिक धडे दिले. त्यातून व त्यांचे सतार वादन ऐकून मी खूप काही शिकलो.''*

❧ ''अरे बापरे! पण मग एवढ्या रियाझाचा त्रास होत नाही का?''

*''होतो तर! मला तर खूपच झाला. कधी कधी बोटातून रक्तही यायचे. आजही माझ्या बोटांवर या सर्वांच्या खुणा आहेत. पण असे असूनही सतार वादन सोडून द्यावे, असे कधीही वाटले नाही कारण एकदा एखाद्या गोष्टीची आवड, गोडी निर्माण झाली की, त्यासाठी कोणताही त्रास सहन करायची ताकद आपल्यात निर्माण होते. उलट त्रास झाला की त्यातून ती गोष्ट पूर्णत्वाला न्यायची जिद्दही निर्माण होते.*



**मन थेंबांनी घालील सखी दारात रांगोळी, थुई थुई नाचतील फूलतोरणाच्या ओळी।**

*त्यामुळेच प्रवासात रियाजाला वेळ मिळत नाही तेव्हा मी मनातल्या मनात सर्व गोष्टींची उजळणी करतो.''*

❧ ''शाहीदभाई, सर्वप्रथम स्टेजवर तुम्ही सतार कधी वाजवलीत आणि त्यावेळी तुम्हाला प्रेक्षकांची भीती नाही वाटली?

*''मी सात वर्षांचा असताना प्रथम स्टेजवर सतार वाजविली पण त्यावेळी प्रेक्षकांची भीती नाही वाटली. कारण मी फक्त माझ्या वडिलांनाच भीत असे. त्यांच्याकडून कौतुक मिळणे फारच कठीण. ते नेहमी माझ्या चुका दाखवत व माझ्या सतार वादनात सुधारणा सांगत. ते म्हणत, ''तारीफ तो गैरोंसे होनी चाहिये, अपनोंसे नहीं।'' मात्र, त्यांच्या अशा स्वभावामुळेच माझ्या वादनात सुधारणा सांगत. ते म्हणत, ''तारीफ तो गैरोंसे होनी चाहिये, अपनोंसे नहीं।'' मात्र, त्यांच्या अशा स्वभावामुळेच माझ्या वादनात मी वेळोवेळी सुधारणा करू शकलो.''*

❧ ''सतारव्यतिरिक्त तुम्हाला इतर कोणती वाद्ये वाजवता येतात?''

*''कोणतेही वाद्य शिकायचे असेल तर ताल व सूर ह्यांच्या ज्ञानासाठी गायन व तबला येणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे मलाही ते येते.''*

❧ ''तंबोरा, वीणा व सतार या तिन्हीत फरक काय आहे?''

*''वीणा म्हणजे तंतू वाद्य. यातील विविध प्रकार म्हणजे रूद्रवीणा, विचित्र वीणा, रात तंत्री वीणा (संतूर) इ. तंबोरा हा फक्त साथीसाठीच वापरला जातो. तुम्ही नीट पाहिलंत तर तुमच्या असं लक्षात येईल, की तंबोरा वाजविणाऱ्यांची बोटं एकाच ठिकाणी फिरत असतात, तर सतार वाजविताना सतारीची पूर्ण लांबी वापरली जाते.''*

❧ ''श्रोत्यांच्या दाद देण्याचा परिणाम तुमच्या वादनावर होतो का?''

*''निश्चितच. कारण आपलं वादन आवडलं तर श्रोते दाद देणार आणि त्यांनी दाद दिली तर आपल्याला वाजवायला अजून उत्साह येणार. त्यामुळे कार्यक्रमांच्या वेळी श्रोते कसे आहेत? याचा विचार करूनच रागांची निवड केली जाते. काही काही शहरातले श्रोते मला जास्त रुचतात. उदा. मुंबईतले श्रोते मला जास्त आवडतात. मग त्यांची संख्या कमी असली तरी चालते कारण ते जाणकार व दर्दी श्रोते आहेत. मैफिलींसाठी मी अनेकदा परदेशातही जातो. तिथेही भारतीय संगीताची आवड असणारे श्रोते आहेत. त्यांचाही चांगला प्रतिसाद असतो. पण तरीही भारतातच कार्यक्रम करायला मला अधिक आवडते. कारण आपली संस्कृती व श्रोते दोन्ही चांगले आहेत.''*

❧ ''आमच्या छात्र प्रबोधनच्या छोट्या वाचकांना काही संदेश द्याना?''

*''एवढं नक्की सांगेन की, तुमच्या कुठल्याही गोष्टींसाठी जेव्हा आई-वडील तुमच्यावर टीका करतात तेव्हा तुम्ही अजून सुधारणा करावी आणि इतरांच्या कौतुकाला पात्र व्हावं, हाच त्यांचा उद्देश असतो. या टीकेतून शिकत शिकतच उद्याचे कलाकार निर्माण होत असतात. तुम्हीही अपयशाने न खचता पुढे वाटचाल करत, वेळोवेळी नवीन सुधारणा करत, यश मिळविले पाहिजे. मग ते कोणत्याही क्षेत्रातले असो. ते निश्चितच आनंद देणारे असते.''*

(मुलांनो तुम्हीसुद्धा तुमच्या गावात आलेल्या अशा मोठ्या व्यक्तींशी बोलण्याची संधी मिळत असेल तर सोडू नका आणि त्यांची मुलाखत घेऊन आमच्याकडे जरूर पाठवा.)

●●

**वर्ष ६ अंक ७ मधील विज्ञान शब्दकोड्याचे उत्तर**

| संशोधक | शोध |
|---|---|
| गॅटलिंग | मशीनगन |
| गॅटडवर्ग | छपाईयंत्र |
| कोटर | पिस्तोल |
| मॅकमिलन | सायकल |
| ग्रॅहमबेल | टेलिफोन |
| राईटबंधू | हवाईजहाज |
| एलीअसही | शिलाईमशीन |
| एडीसन | विद्युतलॅम्प |
| मेरीक्युरी | रेडीयम |
| हेमरिक्रेंटीन | सिनेमास्कोप |

**सुख भिजवी पावलांस, नजरेला गगन थिटे। सोसत जे आले सल, त्यांवरही सोनपुटे।।**



# ओळख ग्राहक वरदान कायद्याची

– सूर्यकांत पाठक

ग्राहक संरक्षण कायदा संमत झाला तो ग्राहकांना न्याय देण्यासाठी, ग्राहकाला जागृत करण्यासाठी. परंतु खरोखर आपल्याला या कायद्याची ओळख आहे का? अनेकदा आवश्यक व न्याय्य गोष्टींविरूद्ध आपण आवाज उठवत नाही, असेच दृश्य सामान्यत: दिसते. १५ मार्च हा 'जागतिक ग्राहक दिन' या निमित्ताने या कायद्याची ओळख करून घेऊ.

जेव्हा आपण व्यक्तिगत पातळीवर सेवा व वस्तूंचा उपभोग घेतो तेव्हाच आपण ग्राहक असतो. वस्तू किंवा सेवा, व्यवसायासाठी खरेदी केल्यास त्याला ग्राहक म्हणता येणार नाही. उदा. रिक्षांचा वापर व्यवसायासाठी केल्यास तो ग्राहक नाही, स्वत:च्या वापरासाठी रिक्षा घेतली तर तो मात्र ग्राहक ठरतो. या कायद्याद्वारे सदोष वस्तू व सेवा याविरुद्ध न्याय मागता येतो. वस्तूंच्या खरेदीत किराणा–भाजीपाला–तयार खाद्यपदार्थ इ. वस्तू 'अत्यावश्यक वस्तूंच्या' गटात मोडतात. तर दागिने, वाहने, फ्लॅट, फर्निचर इ. वस्तू 'मौल्यवान वस्तू' गटात मोडतात. पेन–वही, साबण, सौंदर्य प्रसाधने इ. किरकोळ खरेदीत मोडतात. तसेच, आर्थिक सेवा, दूरध्वनी, टपाल, डॉक्टर, वीज महामंडळ, स्वस्त–धान्य पुरवठा केंद्र इ. विविध सेवांच्या त्रुटीबाबत आपण या कायद्याद्वारा न्याय्य मागू शकतो.

वारंवार बंद पडणारे फोन, जाणारी वीज, उशीर करणाऱ्या गाड्या यासारख्या बाबींविरूद्ध आपण एकटे काय करू शकतो? असे वाटते. परंतु अशा सेवांमधील त्रुटींविरूद्ध आपण न्यायालयीन दाद मागू शकतो. अशी तक्रार ग्राहक, मान्यता प्राप्त ग्राहक संस्था व राज्य/केंद्र सरकार करू शकतात. अर्थात या कायद्याला काही सेवांचा अपवाद आहे.

१. मोफत उपलब्ध असणाऱ्या सेवा (उदा. धर्मादाय दवाखाना, वाचनालये, धर्मशाळा इ.)

२. वैयक्तिक कराराच्या स्वरूपात दिल्या जाणाऱ्या सेवा (उदा. मोलकरीण, घरगडी इ.)

**कोठे मिळतो हा न्याय? कसे होते हे संरक्षण?**

ग्राहक कायद्याद्वारा न्याय मिळू शकतो, मात्र त्यासाठी आपण न्यायालयापर्यंत जावे लागते. कायद्याने न्यायालय सदृश्य त्रिस्तरीय यंत्रणा स्थापली आहे. १) जिल्हा तक्रार निवारण मंच, २) राज्य तक्रार निवारण आयोग, ३) राष्ट्रीय तक्रार निवारण आयोग. या तीन स्तरांवर निर्णय दिले जातात. या आयोगात ५ विविध जबाबदार व्यक्ती सदस्य म्हणून निवडल्या जातात. तक्रार दाखल करायला वकील देण्याची गरज नसते किंवा विशिष्ट कायदेशीर परिभाषेत ती नोंदवायला हवी असे बंधन नाही. 'घडले ते व तसे लिहून देणे' हीच तक्रार करण्याची पद्धत होय.

*१९८३–८४ साली लोहिया मशीन लि. हिरो होंडा वगैरे स्कूटर उत्पादकांनी ''ग्राहक हिताय'' स्कूटर नोंदणी जाहीर केली आणि त्यासाठी दर ग्राहकांकडून रुपये ५००/– याप्रमाणे अनामत रक्कमही गोळा केली. अनेक ग्राहकांनी नोंदणी रद्द केल्यानंतरही त्यांना अनामत रक्कम परत करण्याच्या बाबतीत या कंपनीने चाल–ढकल केली. मुंबई ग्राहक पंचायतीने अशा शेकडो, स्कूटर–ग्राहकांच्यावतीने या अन्यायाविरूद्ध दाद मागण्याचा विडा उचलला. लोहिया मिशन विरूद्ध राष्ट्रीय आयोगाकडे आणि हिरो होंडा, आंध्र प्रदेश स्कूटर्स व चामुंडी मोपेड विरूद्ध महाराष्ट्र राज्य आयोगाकडे तक्रारी दाखल केल्या. संपूर्ण केस अभ्यासल्यानंतर न्यायालयाने अत्यंत ऐतिहासिक निर्णय दिला. 'या कंपन्यांनी विलंब काळासाठी १८% व्याजासहीत सदर अनामत रकमा ग्राहकांना परत कराव्यात.' त्याचप्रमाणे अशाप्रकारे ज्या इतर लाखो ग्राहकांना या कंपन्यांनी अनामत रकमा परत केल्या नाहीत अशा ग्राहकांच्या याद्या न्यायालयात सादर करण्याचे आदेश देऊन लक्षावधी ग्राहकांना त्यांच्या अनामत रकमा सव्याज परत मिळण्यासाठी मार्ग खुला केला आहे.*

**सई गोरटी शेलाटी, तिचे जाईजुई मन। निळया वाऱ्यावर तिने, गाणे दिले उधळून।।**

तक्रार ज्यांच्याविरूद्ध असेल अशा व्यक्तींना व ग्राहक संघटनेला तक्रारप्रत द्यावी. जिल्हामंचाला ४ व राष्ट्रीय आयोगाला ६ प्रती पाठवाव्यात. अर्जासोबत कोणतीही कोर्ट फी/स्टँप फी भरावी लागत नाही. अशाप्रकारे स्वत:ची बाजू स्वत: मांडून किमान खर्चात अतिशय जलद न्याय (९० दिवसात) तुम्ही मिळवू शकता! प्रश्न आहे, आपण त्याचा योग्यवेळी अवलंब करणार की नाही याचा! तक्रार निवारण यंत्रणेपुढे सदोष वस्तू, निकृष्ट दर्जाच्या सेवा, अवाजवी किंमत आकारणी, अनुचित व्यापारी प्रथा, यांविषयी आपण तक्रार करू शकतो. तक्रार करताना घडलेली घटना क्रमवार समजेल अशा भाषेत, योग्य मंचाकडे, आवश्यक प्रतीसह पाठवावी. आपली तक्रार योग्य असेल तर तक्रारीचे निवारण पुढील स्वरूपात होते.

*चौकशी करण्याचा, माहिती मिळविण्याचा आपला मूलभूत अधिकार आहे. परंतु आपण त्यासाठी वाद घालू इच्छित नाही. परंतु असा वाद घातल्यास न्याय मिळतो. तामिळनाडू, चेन्नई मधील डॉ. मेधा कर्णिक यांच्या वतीने केलेल्या केसमध्ये हे लक्षात येईल. डॉ. कर्णिक यांनी त्रिची ते चेन्नई, प्रथम श्रेणीचे रॉकफोर्ट एक्सप्रेसचे व पुढील दिवसांचे चेन्नई एक्सप्रेसचे चेन्नई ते मुंबई तिकिट काढले. या दोन्ही गाड्यांचे तिकिट त्यांच्याकडे होते. त्रिचीहून चेन्नईला पोहोचल्यावर त्यांनी पुढील गाडी पकडण्यासाठी घाई केली. एक वर्षाचा लहान मुलगा व भरपूर सामान घेऊन धावाधाव केल्यावर त्यांना सांगण्यात आले, ही गाडी बुधवारी निघत नाही. ज्या गाडीचे आरक्षित तिकिट त्यांच्या हातात होते ती गाडी फक्त सोमवार, मंगळवार, शनिवार व रविवार सुटते.*

*आता बुधवारी गाडी चेन्नई ते मुंबई जातच नसल्याने अतिशय अडचणीत, दाटीवाटीत दादर एक्सप्रेसच्या आरक्षित नसलेल्या डब्यातून त्यांना प्रवास करावा लागला. अयोग्य, अपुरी माहिती दिल्याबद्दल हा त्रास झाला. याच कारणांनी ही केस राष्ट्र आयोगाकडे मांडण्यात आली. रेल्वेच्या कर्मचाऱ्यांनी पूर्ण माहिती देण्यास केलेली हेळसांड, दाखविलेला हलगर्जीपणा यामुळे जो त्रास झाला त्याबद्दल रुपये ७५००/- नुकसानभरपाई व रुपये ५००/- तक्रार करण्याचा खर्च देण्याचा आदेश देण्यात आला.*

१) वस्तूची दुरूस्ती करून घेणे २) वस्तू बदलून किंवा पैसे परत मिळणे ३) जादा आकार परत करणे ४) नुकसान भरपाई ५) तक्रार खर्च.

तक्रार पत्रात योग्य क्रमवार माहिती, स्पष्ट तरीही नम्र भाषा, आवश्यक कागदपत्रांच्या प्रती असाव्यात. खरेदीचा पूर्ण तपशील म्हणजेच, वस्तूच्या उत्पादकाचे नाव, वस्तूचे वर्णन, मॉडेल नं., वॉरंटी कार्ड, सिरिअल नंबर, खरेदीची तारीख, खरेदी कोठे केली याचा नोंदणीकृत पत्ता या सर्वांची माहिती तक्रारीत असावी.

**तक्रारीचे निवारण कसे होते?**

तक्रार दाखल झाल्यावर विरूद्ध पक्षाला त्याची प्रत पाठविण्यात येते. ३० दिवसांच्या आत त्यासंबंधी खुलासा मागवला जातो. या खुलाशाची प्रत विरूद्ध पक्षाने ग्राहकाला घरपोच पाठवायची असते. त्याबाबत आपले म्हणणे ग्राहकाने मंच/आयोग यास पुन: लेखी कळवायचे. त्यानंतर होणाऱ्या सुनावणीच्या वेळी तक्रारदार व विरूद्ध पक्ष दोघांनी उपस्थित राहणे बंधनकारक असते. वस्तू सदोषासंबंधीचा निर्णय प्रयोगशाळेत चाचणी घेऊन केला जातो. मंचाने दिलेले निकाल व आदेश हे दोन्ही पक्षांवर बंधनकारक असतात. निकालाचे पालन न केल्यास, त्या पक्षाच्या वैयक्तिक मालमत्तेवर टाच आणून, सदर आदेशाच्या अंमलबजावणीचे अधिकार मंचाला आहेत.

जिल्हा मंचाविरूद्ध ३० दिवसांच्या आत राज्य आयोगाकडे अपील करता येते; व राज्य आयोगाच्या संदर्भात राष्ट्र आयोगाकडे अपील करता येते. अर्थात, कोणत्याही स्तरावर केवळ एकदाच अपील करता येते. चौकशी करण्याचा व माहिती मिळवण्याचा आपला मुलभूत अधिकार आहे. प्रसंगी त्यासाठी वाद घालावा लागला तरी माघार घेऊ नये. वेळप्रसंगी तक्रार पुस्तकात तक्रारीची नोंदणी करावी. अन्यायाविरूद्ध आवाज उठवून आपल्या ग्राहक हक्कांबाबत जागृक असायला हवे. 'ग्राहक कायद्याचा' फायदा करवून घेणे; हे खरेतर फारसे जिकीरीचे नाही. त्यासाठी हवी फक्त कायद्याची सर्वसामान्य माहिती! आणि आवश्यक असेल तेव्हा आपल्या जवळच्या ग्राहक संघटनेचे साहाय्य जरूर घ्या. तरच 'ग्राहक राजा' हे संबोधन सार्थ ठरेल!

●●

**सूर्यकांत पाठक,** संघटनमंत्री
अखिल भारतीय ग्राहक पंचायत, महाराष्ट्र

**सुगंधित गुलाब खरेच सुखी असतात, अष्टौप्रहर काट्यांच्या पहाऱ्यातच असतात.**

## सुरुवात आमची कथा तुमची

*'मर्मबंधातील ठेव' या दीर्घकथेची सुरुवात आम्ही आपल्याला मागील अंकात दिली होती. या कथेचा पुढील भाग विद्यार्थ्यांनी लिहावा अशी कल्पना होती. त्यानुसार काही प्रमाणात विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद आला. त्यातील, त्यातल्या त्यात चांगला वाटलेला भाग खाली देत आहोत. कथेच्या पुढील भागांचे लेखन करताना काही गोष्टी सुचवाव्याशा वाटतात.*

- *बऱ्याच विद्यार्थ्यांनी कथेचा भाग चित्रपटशैलीचा वापर करून अतिरंजित पद्धतीने लिहिला आहे.*
- *मूळ कथेतील सर्व तपशिलांचा बारकाईने अभ्यास करून कथेचा पुढील भाग लिहावा. (उदा. बास्केट, नायलॉनची दोरी, आजूंचे आजारपण, रमा व तिचा भूतकाळ इ.)*
- *आपण लिहिलेल्या कथेच्या भागातून पुढील भाग लिहिता येईल, असा शेवट असावा. (तुमच्या भागाला अनेक पर्याय असावेत.)*
- *व्यक्तिरेखा अधिक फुलवाव्यात, कथेशी संबंधित नवीन व्यक्तिरेखा व प्रसंग तुमच्या भागात आणावेत.*
- *दीर्घकथेचा भाग २ जरी खाली दिला असला तरी, तो खुपसा समाधानकारक नसल्याने आपण पुन: भाग २ च वेगळ्या पद्धतीने लिहून आमच्याकडे पाठवावा.*

**दीर्घकथा : भाग २**

# मर्मबंधातली ठेव...



एकदा आजूंना हार्टचेकिंगसाठी मुंबईला जायचे होते. त्यांची बस स्टँडवर आली तेव्हा आजूंनी पाहिले, की एक मुलगी जिवाच्या आकांताने पळत होती. वय होते फक्त १० वर्षे. ती मुलगी आजूंकडे आली व म्हणाली, ''मला वाचवा, माझ्या मागे ते गुंड लागले आहेत.'' आजूंनी तिला आपल्या कपडे असलेल्या सॅकमध्ये लपवले व ते कपडे बास्केटमध्ये ठेवून ते हळूहळू जाऊ लागले. ते रस्त्यावर आले तर तो गुंड तिथे येऊन म्हणाला की, ''तुम्ही एखादी मुलगी पाहिली आहे का? तिच्या अंगावर एक सुंदरसा हार होता व तिचे कपडेपण चांगले होते.'' आजू म्हणाले, ''नाही बा, मी नाही पाहिली.'' तरीही त्या गुंडाला आजूंचा संशय आला आणि तो गुंड आजूंना मारू लागला. ते पाहिल्याबरोबर रमा बाहेर आली व तिने त्या गुंडाच्या हाताचा कडकडून चावा घेतला. आता गुंडाने रमाकडे मोर्चा वळवला. त्याने सुरा काढला व तो रमाकडे निघाला. तेवढ्यात आजूनी बास्केट त्या गुंडाच्या हातावर जोरात मारली. त्याचा सुरा खाली पडला. तो घेण्यासाठी आजू वाकले तर त्या गुंडाने त्यांच्या छातीवर लाथ मारली. आजूंनी त्याची पर्वा न करता सुरा उचलला व गुंडाला पळवले. आजूंकडे रमाने कृतज्ञतेने पाहिले तर हे काय! आजूंचा हात छातीवर होता. त्यांच्या छातीतून कळा येत होत्या. रमाने पळत जाऊन रिक्षा आणली व आजूंना आधार देऊन हॉस्पिटलमध्ये नेले. त्यांचा फोननंबर त्यांच्या पाकिटातून मिळवून आजूंचा मुलगा व सून यांना बोलावले. नंतर बरं वाटल्यावर आजूंनी रमाला विचारलं, ''काय गं बेटा! तू कोणाची मुलगी? कुठे राहातेस?'' रमाने सांगायला सुरुवात केली...

(काय असेल रमाची हकिकत बघा बरं तुम्हाला लिहिता येते का?)


**अमेय फाटक**

ज्ञान प्रबोधिनी, इयत्ता ७ वी


त्यागाचा मी रचला डोंगर, मापायाला माझी उंची। खोल किती अन् उंच किती मी, यास्तव होती धडपड माझी!

## एप्रिल महिन्यातील कार्यक्रम

**ग्रंथालय व वाचन प्रकल्प :** एप्रिल महिन्यातले पहिले १०-१२ दिवस परीक्षेमध्ये जातील व नंतर मुलांना सुट्टी लागेल. एरवी शालेय पुस्तकी अभ्यासाचे ओझे आणि दूरदर्शन, चित्रपट, क्रिकेट यांचा विद्यार्थ्यांवर असलेला पगडा यामुळे विद्यार्थ्यांनी वाचनासाठी वेळ काढणं, आवडीनं अवांतर वाचन करणं जवळजवळ संपत चाललेलं दिसतं. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी लागावी; काय वाचावं, अन् कसं वाचावं हे त्यांना कळावं- यासाठी एप्रिलमध्ये आपण एक ग्रंथालय सुरू करू शकाल. आपल्याकडील, आपल्या परिचितांकडील व विद्यार्थ्यांकडून त्यांच्या घरी असलेली व मुलांनी वाचावीत अशी पुस्तके २ महिन्यांपुरती गोळा करा.त्यांची योग्य निवड करा. त्यासाठी शिक्षक, अन्य जाणकार, साहित्यिक यांचीही मदत घ्या. या निवडलेल्या पुस्तकांची योग्य नोंद करा. १५ ते ३० एप्रिल या काळात रोज २ तास वाचनासाठी ग्रंथालय खुले ठेवा. त्यासंबंधी विद्यार्थ्यांना आधीच सूचना द्या. २ ते ५ रुपये शुल्क घेऊन त्यांची नावनोंदणी करा. या शुल्कातून पुस्तकांना कव्हर्स घाला. विद्यार्थ्यांना ४० पानी वह्या द्या. या वहीत विद्यार्थ्यांनी रोज जे वाचलं असेल त्याबद्दल ५ ते १० ओळीत लिहून काढावे. रोज १० ते १५ मिनिटे १-२ पुस्तकांचा परिचय विद्यार्थ्यांना करून द्या. कालांतराने विद्यार्थ्यांनी त्यांनी वाचलेल्या पुस्तकांचा परिचय सर्वांना करून द्यावा. वाचनाच्या चुकीच्या सवयी घालवण्यासाठी प्रयत्न करा. काही पुस्तकांमधील उतारे मोठ्याने वाचण्यास सांगून, मोठ्याने वाचन अधिक प्रभावी होण्यासाठी काय करावे हेही सुचवा. स्थानिक अथवा जवळपासच्या एखाद्या साहित्यिकांना बोलावून त्यांच्याशी गप्पा गोष्टींचा कार्यक्रम ठेवा, मुलांना एकेका पुस्तकाची भूमिका देऊन एखादे नाट्य, प्रसंगनाट्य सादर करण्यास विद्यार्थ्यांना सुचवा. १००० किंवा त्याहून अधिक पाने (किंवा १० ते १५ पुस्तके) वाचणाऱ्या व त्याची नोंद ठेवणाऱ्यास खास बक्षीस जाहीर करा. पुस्तक परिचय लेखन स्पर्धा घ्या. अशा विविध मार्गांनी वाचनाची गोडी लागेल, वाचावेसे वाटेल, काय व कसे वाचावे हे समजेल या दृष्टीने हा ग्रंथालयाचा व वाचनाचा प्रकल्प चालवावा. शक्य झाल्यास तो एप्रिलनंतरही चालू ठेवावा. ग्रंथालय व्यवस्थापन व अन्य कामांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. छात्र प्रबोधनमध्ये वेळोवेळी 'वाचलेच पाहिजे असे काही' या शीर्षकाखाली दिलेली पुस्तके व ह्याच नावाने छात्र प्रबोधनने प्रकाशित केलेल्या पुस्तकात दिलेल्या यादीतील पुस्तके मिळविण्याचा प्रयत्न करा. शाळेची ग्रंथालये, अन्य स्थानिक ग्रंथालये यांना विनंती करून १५-२० दिवसांसाठी त्यांच्याकडूनही ही पुस्तके मिळविण्याचा प्रयत्न करा. याबाबतचे तुमचे अनुभव आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा. काही मदत लागल्यास जरूर कळवा; यथाशक्य प्रयत्न करू.

## 'छात्र प्रबोधन'ची स्थानिक कार्यालये

**निगडी** : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४. ☎ ७८४३८०
**सोलापूर** : ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर, डफरिन चौक, सोलापूर. ☎ ६२५७८२
**सातारा** : श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२७/१अ, अंजली कॉलनी तर्फ, सातारा. ☎ ५०५०४
**कराड** : श्री. दत्तात्रय ना. कुलकर्णी, नावडीकर कॉम्प्युटर ट्रेनिंग सेंटर, पंताचा कोट, कराड. ☎ २५०५
**सांगली** : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२ गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली. ☎ ३३१३८२.
**कोल्हापूर** : डॉ. शुभांगी कुलकर्णी, आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. ☎ ५२१५३४.
**इचलकरंजी** : श्री. विनायक गद्रे, वॉर्ड नं. ५, घर नं. ६७ अ, झेंडा चौक, इचलकरंजी. ☎ ४२४००८
**नाशिक** : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रस्ता, नाशिक. ☎ ५७४८३०
**ठाणे** : डॉ. अजित दातार, बी २० अहिल्या सोसा., घंटाळी रस्ता, ठाणे (प.) ☎ ५४२१०८७
**डोंबिवली** : सौ. सविता सुनील ढोणसळे, बी-१३ कॉमेटकुंज को.हौ.सो., टिळकनगर शाळेजवळ, डोंबिवली (पू.) ☎ ४५४६८८
**बोरिवली** : सौ. अंजली जोशी, ४०१ रमणिक टेरेस, कस्तुर पार्क, शिंपोली रोड, बोरिवली (प.) ☎ ८९८६२५९
**पार्ले** : सौ. वसुंधरा भोसले, 'त्रिमूर्ती' प्लॉट नं. ३९, तेजपाल स्कीम, रोड नं. ३, विलेपार्ले (पू.) ☎ ८२०४०७६.
**अलिबाग** : श्री. राम जोशी, १ कृष्णविहार, समर्थ नगर, पिंपळघाट, अलिबाग. ☎ २५३०९.
**रत्नागिरी** : सौ. अंजली कार्लेकर, लक्ष्मीबाई लिमये चाळ, जोशी पाळंद, रत्नागिरी. ☎ २०७२४
**धुळे** : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरूडबाग, धुळे.
**परभणी** : श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर, परभणी.
**लातूर** : डॉ. अरूणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ☎ ४३६१४
**औरंगाबाद** : सौ. स्वाती पळसकर, सनी कॉर्नर, दुसरा मजला, पैठण गेट, औरंगाबाद. ☎ २३३२६.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० फाल्गुन शके १९१९, १ मार्च १९९८ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

**पिढ्या पिढ्यांच्या निर्भय, आम्ही भारतीय भगिनी। घराघरांचे दुर्ग झुंजवू झुंजू समरांगणी, आम्ही भारतीय भगिनी!**

नोंदणी क्रमांक : PHM/22/VIII/1997 टपाल नोंदणी क्र. PNCW/349. छात्र प्रबोधन; तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. L128

# एक आम्ही होऊ...

अभिमानाने, अनासक्तीने
विश्वासाने, विनयवृत्तीने
एक विचारे, एक मताने एक आम्ही होऊ!

वारस आम्ही मैत्रेयीच्या
सरस्वती विदुषी गार्गीच्या
कणाकणाने ज्ञान वेचुनि आत्मोन्नति घडवू!

शिवसंकल्पे प्रसन्न तन-मन
सजगतेत हो गुणसंवर्धन
उत्कट अस्फुट मनःशक्तीचा शोध नित्य घेऊ!

लक्ष्मी अहिल्या स्फूर्तिदायिनी
आत्मबलाने बनु तेजस्विनी
पराक्रमाच्या कृती घडविण्या जिद्द मनी जाणवू!

उंबरठ्याचे बंधन त्यजुनि
स्त्रीसमाज हा जागृत करुनि
किरणशलाका होऊन जगती ज्ञानदीप चेतवू!

स्त्रीशक्ति हे शस्त्र बनू दे
अनीतीचा भ्रष्टाचार वधु दे
बुद्धि, शक्ति अन् सामर्थ्याने जगन्मान्य होऊ!

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे 411 030 ☎(०२१२) ४७७६९१, ४५८०९५
**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत** : रुपये १०/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १२५/-
**प्रकाशन दिनांक** : राष्ट्रीय सौर फाल्गुन १० शके १९१९
१ मार्च १९९८